नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष १६ * अंक ३०८ * | * भंडारा * | सोमवार, दिनांक ५ मे २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त


## बद्रीनाथ धामचे कपाट उघडले

■ वृत्तसंस्था, चमोली, दि. ४ :
रविवारी सकाळी ६ वाजता बद्रीनाथ धामचे दरवाजे उघडण्यात आले आहेत. गणेश पूजेनंतर मंदिराचे रावल (मुख्य पुजारी) यांनी मंदिराचे दरवाजे उघडले. महिलांनी लोकगीते गायली. गढवाल रायफल्सच्या बँडने पारंपारिक धून वाजवली. यासह चारधाम यात्रा पूर्णपणे सुरू झाली आहे.

सकाळी मंदिर परिसरात १० हजारांहून अधिक भाविक उपस्थित होते. मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी देखील भगवानांची पूजा करण्यासाठी मंदिरात पोहोचले. पुढील ६ महिने भाविकांना भगवान बद्रीविशालचे दर्शन घेता येईल. दरम्यान, या यात्रेसाठी देशाच्या विविध भागातून यात्रेकरू मोठ्या संख्येने पोहचू लागले आहेत.

अग्रग्रलेख

खरीखरी...

# मी मुख्यमंत्री होणारच !

महाराष्ट्राचे अर्धा डझन वेळा उपमुख्यमंत्री झालेले, कर्तबगार अर्थमंत्री म्हणून ज्यांनी आपला झेंडा बुलंद केलेला आहे. अशा अजित दादांच्या मनात मंत्रालयातील सहाव्या मजल्यावरील मुख्यमंत्र्याचा कक्ष काही डोळ्यासमोरून हलत नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी जसे दर महिन्याला मन की बात करतात. तसेच अजित दादा आपली दिल की बात करतात. उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचा चेहरा मोठा मिश्कील आहे. पण त्यांचा स्वभाव मात्र कडक आहे. त्यांच्या कपाळावर सतत आठ्या असतात. त्यामुळे त्यांचा चेहरा अधिक बोलका दिसतो. आपले सख्खे काका शरदचंद्रजी पवार यांच्या मनातील विचार या सख्ख्या पुतण्याला तर सोडाच, जगात कुणालाही ओळखता येत नाहीत. त्यांचा निर्विकार चेहरा त्यांच्या मनात काय आहे. याचा थांगपत्ताच लागू देत नाही. अशा मुख्यमंत्री राहिलेल्या काकांचा वारंवार उपमुख्यमंत्री राहिलेल्या पुतण्याने तक्रार करणे प्राप्त होते. आपल्या काकांनीच आपल्याला मुख्यमंत्री बनू दिले नाही. हा सल त्यांच्या मनात आजही कायम आहे. प्रत्येक वेळी राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस यांच्यात ठरलेले होते की, ज्यांना जास्त जागा त्या पक्षाचा मुख्यमंत्री आणि दुसऱ्या पक्षाचा उपमुख्यमंत्री. 2005 च्या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसला काँग्रेसपेक्षा दोन जागा जास्त मिळाल्या होत्या. पण तेव्हा काकांची चलती होती. काकांनी काँग्रेसला मुख्यमंत्रीपद दिले. विलासराव देशमुख यांना ते पद मिळाले. पण त्या बदल्यात महत्त्वाची मलईदार मंत्रालये राष्ट्रवादीकडे आली. त्यावेळी अजितदादा मुख्यमंत्री बनू शकले असते. पण काका शरद पवार यांनी असा काय वार केला की, मोहक शरद ऋतू विदर्भातील ग्रीष्मासारखा वाटू लागला. परवा मुंबईत आयोजित महाराष्ट्र महोत्सवाच्या समारोपात एका पत्रकाराने महाराष्ट्रात अद्याप महिला मुख्यमंत्री झाली नाही. याचा उल्लेख केला, तसेच एखाद्या महिलेला हे पद मिळाले पाहिजे असे म्हटले. त्याला अजितदादा पवार यांचा विरोध असण्याचे कारण नव्हते. परंतु अजित दादांच्या मनातील खदखद तेव्हाही बाहेर आली. मुख्यमंत्री कोणीही असले तरी म्हणजेच ते काँग्रेसचे असोत, शिवसेनेचे असोत किंवा भाजपचे असोत. अजित दादांना मात्र उपमुख्यमंत्री पद म्हणजे उपमुख्यमंत्री पदच त्यांच्या वाट्याला येत गेले. काकांनी अपेक्षित सहयोग न दिल्यामुळे आपल्याला संधी असूनही मुख्यमंत्रीपद मिळाले नाही. मग हे त्यांच्या मनाला बोचणार नाही तर काय. काकांच्या छत्रछायेखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात आपल्या राज्याचे सर्वोच्च पद मिळू शकणार नाही. असे वाटल्याने त्यांनी राष्ट्रवादीतील आमदार मोठ्या संख्येने आपल्याकडे वळवले आणि ते सत्तेमध्ये डेरेदाखल झाले. त्यापूर्वी बहुसंख्य शिवसेनेचे आमदार सुरतमार्गे गुवाहाटीला गेले होते. त्याचे बक्षीस म्हणून अपेक्षा नसतानाही भारतीय जनता पक्षाच्या पक्ष श्रेष्ठींनी एकनाथ शिंदे यांच्या मुख्यमंत्री पदावर शिक्कामोर्तब केले होते. अजित पवार यांना दुसरे उपमुख्यमंत्री पद देण्यात आले आणि शिवसेना व भाजपमधील कितीतरी मंत्रीपद इच्छुक आमदारांची घनघोर निराशा झाली. आता नुकत्याच संपन्न झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीतील महाविजयाचे शिल्पकार देवेंद्र फडणवीस यांना दिल्लीचे पक्षश्रेष्ठीही मुख्यमंत्री पदापासून दूर ठेवू शकले नाहीत. म्हणजे आता निदान पुढील चार ते साडेचार वर्षे तरी मुख्यमंत्री पदाची अपेक्षा करणे शक्य नाही, हे स्पष्ट झालेले आहे. पुढील निवडणुकीत सध्याच्या भाजपच्या जेवढ्या जागा निवडून आलेल्या आहेत. तेवढ्या जागा भाजपच लढणार आहे. म्हणजे अजित दादांना मुख्यमंत्री व्हायचे असेल. तर भारतीय जनता पक्षाच्या जागा कमी झाल्या पाहिजेत आणि अजितदादांच्या जागा वाढल्या पाहिजेत. हे गणित पुढील निवडणुकीत बरोबर जमले, तर अजितदादा मुख्यमंत्री बनू शकतील. कसेही करून त्या पदापर्यंत पोहोचायचा मार्ग अजितदादा आपल्या करारी स्वभावाप्रमाणे शोधून काढू शकतात?. महाराष्ट्राचा कोपरा न् कोपरा काकांप्रमाणेच त्यांनाही ठाऊक आहे. तेव्हा आता सदा सर्वकाळचे उपमुख्यमंत्री अजित दादांनी कंबर कसून आपल्या पक्षाच्या प्रचारासाठी आणि पहिल्या क्रमांकाचा पक्ष बनवण्यासाठी 80 ते 90 आमदार निवडून आणले पाहिजेत?. एवढ्या जागा युती सरकारच्या सध्याच्या व्यवस्थेप्रमाणे कशा मिळवायच्या याचे गणित दादांच्या मनात असेलच. हे गणित सोडवण्यासाठी दादांनी आता स्वतः कंबर कसली पाहिजे. काकांनी दिले नाही तर काय झाले. आपण स्वबळावर मुख्यमंत्री होणार हा त्यांचा निर्धार असावा. सध्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मी पुन्हा येणार असे म्हटले. मध्यंतरीच्या काळात अर्धविराम घेतला आणि आता ते पाच वर्षांसाठी मुख्यमंत्रीपदावर आरूढ झालेले आहेत, एक गोष्ट मात्र नक्की आहे. ज्याच्या हाती तिजोरीची चावी तो मनात येईल त्याला दाबी, हे आता अजित दादांनी दाखवून द्यावे, म्हणजे मी मुख्यमंत्री होणारच, ही त्यांची मनीषा पूर्ण होईल.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# भारताने थांबवले चिनाबचे पाणी

## झेलमचे पाणी रोखण्याची योजना : पंजाबमध्ये २ पाकिस्तानी हेरांना अटक

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ४ :
पाकिस्तानसोबतचा सिंधू पाणी करार रद्द केल्यानंतर भारताने चिनाब नदीचे पाणी रोखले आहे. वृत्तसंस्था पीटीआयच्या वृत्तानुसार, जम्मूतील रामबन येथे बांधलेल्या बगलिहार धरणाने चिनाबचे पाणी थांबवले आहे. त्याच वेळी, काश्मीरमधील किशनगंगा धरणातून झेलम नदीचे पाणी रोखण्याची योजना आहे.

दुसरीकडे, एअर चीफ मार्शल अमरप्रीत सिंग यांनी रविवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची त्यांच्या 7 लोक कल्याण मार्ग येथील निवासस्थानी भेट घेतली. माहितीनुसार, पहलगाम हल्ल्याबाबत पंतप्रधान आणि एअर चीफ मार्शल यांच्यात चर्चा झाली.

पहलगाम दहशतवादी हल्ल्याला १२ दिवस झाले आहेत. पाकिस्तानसोबतच्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, पंतप्रधान मोदी सतत लष्करप्रमुखांसोबत बैठका घेत आहेत; शनिवारी त्यांनी नौदल प्रमुखांसोबतही बैठक घेतली.



पाकिस्तानने सलग १० व्या दिवशी नियंत्रण रेषेवर शस्त्रसंधीचे उल्लंघन केले आहे.

रशियातील पाकिस्तानचे राजदूत मोहम्मद खालिद जमाली यांनी भारताला अणुहल्ल्याची धमकी दिली आहे. शनिवारी रशियन माध्यमांना दिलेल्या मुलाखतीत त्यांनी म्हटले की, जर भारताने पाकिस्तानवर हल्ला केला तर इस्लामाबाद पूर्ण ताकदीने प्रत्युत्तर देईल, मग तो अणुहल्ला असला तरी.

दरम्यान, पंजाबच्या अमृतसर पोलिसांनी रविवारी दोन हेरांना अटक केली. पोलिसांनी सांगितले की दोघेही परदेशात लष्करी छावण्या आणि हवाई दलाच्या तळांची माहिती आणि छायाचित्रे पाठवत होते. हे दोघेही पाकिस्तानी गुप्तचर संस्था आयएसआयचे कार्यकर्ते आहेत.

# रामबनमध्ये सैन्याचे वाहन दरीत कोसळले

## ३ सैनिकांचा मृत्यू



■ वृत्तसंस्था, श्रीनगर, दि. ४ :
जम्मू-काश्मिरातील रामबन जिल्ह्यातील बॅटरी चष्मा भागात रविवारी लष्कराचे एक वाहन ६०० मीटर खोल दरीत कोसळले. या अपघातात तीन सैनिकांचा मृत्यू झाला. लष्कर, पोलिस, एसडीआरएफ आणि स्थानिक प्रशासन बचावकार्य करत आहेत.

यापूर्वी ४ जानेवारी रोजी बांदीपोरा जिल्ह्यात लष्कराचा ट्रक खड्ड्यात कोसळल्याने चार जवानांचा मृत्यू झाला होता. २ सैनिक गंभीर जखमी झाले. ट्रकमध्ये फक्त ६ सैनिक होते.

२४ डिसेंबर रोजी पूंछ जिल्ह्यात लष्कराची एक व्हॅन ३५० फूट खोल दरीत कोसळली. व्हॅनमध्ये १८ सैनिक होते. त्यापैकी ५ जणांचा मृत्यू झाला होता. अपघातात सहभागी झालेले सर्व सैनिक ११ मराठा रेजिमेंटचे होते.

# मविआकडून दादांना सीएमपदाची ऑफर



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :
राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अनेकवेळा मुख्यमंत्री होण्याची इच्छा बोलून दाखवली आहे. मुख्यमंत्री होण्यासाठो योग जुळून यावा लागतो, कारण मलाही अनेक वर्षांपासून वाटते की मी मुख्यमंत्री व्हावे, पण कुठे जमतेय, असे विधान अजित पवार यांनी नुकतेच केले होते. आता महाविकास आघाडीकडून अजित पवारांना मुख्यमंत्री पदाची ऑफर आली आहे.

शिवसेना ठाकरे गटाचे नेते विनायक राऊत यांनी अजित पवार यांना थेट मुख्यमंत्री पदाची ऑफर दिली आहे. रत्नागिरी येथे ते बोलत होते. विनायक राऊत म्हणाले, अजित पवार यांनी महाविकास आघाडीमध्ये यावे, त्यांचे मुख्यमंत्री होण्याचे स्वप्न पूर्ण होईल. तसेच एकनाथ शिंदे आणि भाजपमध्ये दूरी वाढत असून शिंदेंना नैराश्य आले आहे, असे म्हणत राऊत यांनी एकनाथ शिंदे यांना टोला लगावला आहे.

# ऑपरेशन ब्लू स्टार ही चूकच

## राहुल गांधींची कबुली चित्रफित व्हायरल

■ वृत्तसंस्था
बोस्टन, दि. ४ :
१९८४ चे ऑपरेशन ब्लू स्टार ही चूक होती, हे राहुल गांधींनी मान्य केले. दोन आठवड्यांपूर्वी, अमेरिकेतील ब्राउन विद्यापीठात एका कार्यक्रमादरम्यान, राहुल गांधींना ऑपरेशन ब्लू स्टारवर एक प्रश्न विचारण्यात आला. यावर राहुल गांधी म्हणाले, ८० च्या दशकात काँग्रेसने ज्या काही चुका केल्या, मी त्याची जबाबदारी घेण्यास तयार आहे. या कार्यक्रमाचा व्हिडिओ रविवारी व्हायरल झाला. यानंतर भाजप आयटी सेलचे प्रमुख अमित मालवीय म्हणाले- आता राहुल गांधींवर केवळ भारतातच नाही, तर परदेशातही टीका होत आहे.




गेल्या महिन्यात एप्रिलमध्ये राहुल गांधी अमेरिकेतील ब्राउन विद्यापीठात एका ओपन इव्हेन्टमध्ये सहभागी झाले होते. दरम्यान, एका कार्यक्रमात शीख तरुणाने राहुल गांधींच्या जुन्या विधानाचा उल्लेख करताना म्हटले, तुम्ही शिखांबद्दल बोलता, पण भाजप काय करेल याबद्दल तुम्ही शिखांमध्ये भीती निर्माण करता. आम्हाला अभिव्यक्ती स्वातंत्र्य हवे आहे, जे काँग्रेसच्या काळात नव्हते.

तो तरुण पुढे म्हणाला, आनंदपूर साहिब ठराव दलितांच्या हक्कांबद्दल बोलतो, पण काँग्रेसने त्याला फुटीरतावादी म्हटले. न्यायालयाने सज्जन कुमारला शिक्षा दिली, पण आजही काँग्रेसमध्ये सज्जन कुमारसारखे अनेक लोक आहेत.

यावर राहुल गांधी म्हणाले, मला वाटत नाही की शीखांना कशाचीही भीती वाटते. काँग्रेसच्या या चुका मी नसताना झाल्या, पण काँग्रेसच्या इतिहासात जे काही चूक झाली, त्याची जबाबदारी मी घेण्यास तयार आहे.

१९८० च्या दशकात इंदिरा गांधी सरकारने पंजाबमध्ये बंडखोरीविरुद्ध ऑपरेशन ब्लू स्टार सुरू केले. यामध्ये भिंद्रनवाले मारला गेलो. यानंतर, इंदिरा गांधींची हत्या झाली आणि देशभरात शीखविरोधी दंगली उसळल्या. सरकारी आकडेवारीनुसार, या दंगलींमध्ये ३,००० हून अधिक शीख मारले गेले.

# आंतरराष्ट्रीय नाणेनिधी बोर्डातून कार्यकारी संचालकांना काढले



■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ४ :
भारत सरकारने आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (आयएफएम) मध्ये भारताचे कार्यकारी संचालक म्हणून डॉ. कृष्णमूर्ती सुब्रमण्यम यांच्या सेवा तात्काळ प्रभावाने काढून टाकल्या आहेत. हा निर्णय त्यांचा तीन वर्षांचा कार्यकाळ संपण्याच्या ६ महिने आधी घेण्यात आला.

२ मे पर्यंत आयएमएफच्या अधिकृत वेबसाइटवर कार्यकारी संचालक म्हणून डॉ. सुब्रमण्यम यांचे नाव होते, परंतु ३ मे पासून हे पद रिक्त दाखवण्यात आले आहे. सुब्रमण्यम यांची ऑगस्ट २०२२ मध्ये आयएमएफ बोर्डावर कार्यकारी संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली. यापूर्वी ते २०१८ ते २०२१ पर्यंत भारत सरकारचे १७ वे मुख्य आर्थिक सल्लागार (सीईए) होते.

मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने ३० एप्रिल रोजी जारी केलेल्या आदेशात कृष्णमूर्ती यांच्या सेवा तात्काळ संपुष्टात आणण्यास मान्यता दिली. सरकारने यामागे कोणतेही अधिकृत कारण दिलेले नाही.

## मत्स्योद्योग विकास समितीच्या अध्यक्षपदाचा

# राम नाईक यांचा राजीनामा

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :
भाजपचे माजी केंद्रीय मंत्री आणि ज्येष्ठ नेते राम नाईक यांनी राज्याच्या मत्स्योद्योग विकास धोरण समितीच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे.



प्रकृतीच्या कारणास्तव राम नाईक यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे. राम नाईक यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे त्यांचा राजीनामा दिला आहे. महाराष्ट्राचे मत्स्योद्योग विकास धोरण निश्चित करण्यासाठी नेमण्यात आलेल्या समितीचे अध्यक्षपद त्यांच्याकडे देण्यात आले होते.

जानेवारी मध्ये नाईक यांना दीर्घकाळ रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. आता प्रकृती स्थिर असली तरी त्यांनी विश्रांतीसाठी राजीनामा दिला आहे.

# बारावीचा निकाल आज

## मंगळवारपासून मिळणार महाविद्यालयात गुणपत्रिका

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :
राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च 2025 मध्ये बारावीची परीक्षा घेण्यात आली होती. बारावीच्या निकालाबाबत माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने याबद्दलची माहिती दिली आहे. सोमवार 5 मे रोजी दुपारी एक वाजता बारावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर होणार आहे.

राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत 11 फेब्रुवारी ते 11 मार्च या कालावधीत बारावीची परीक्षा घेतली होती. यंदा ही परीक्षा दरवर्षीपेक्षा 10 दिवस आधी घेण्यात आली. त्यानंतर आज बारावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर होणार असून विद्यार्थ्यांची धाकधूक वाढली आहे.

बोर्डाच्या वतीने पत्रकार परिषदेत निकाल जाहीर केला जाईल. या पत्रकार परिषदेत संपूर्ण महाराष्ट्राचा निकाल, विभागनिहाय निकाल जाहीर केला जाईल. त्यानंतर दुपारी 1 वाजल्यानंतर विद्यार्थ्यांना त्यांचा वैयक्तिक निकाल पाहता येणार आहे. तर 6 मे मंगळवारपासून महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना गुणपत्रिका दिली जाणार आहे.

**या संकेतस्थळावर पाहता येईल निकाल**
https://results.digilocker.gov.in
https://mahahsscboard.in
http://hscresult.mkcl.org
https://results.targetpublications.org

**निकाल कसा चेक कराल?**
बोर्डाच्या अधिकृत बेवसाईटवर जा.
होमपेजवर महाराष्ट्र एसएससी/एचएससी निकाल 2025 लिंक दिसेल. त्यावर क्लिक करा.
नवीन विंडो उघडेल. त्याठिकाणी तुमचा सीट क्रमांक टाका. तसेच सोबत आईचे नाव भरुन सबमिट बटणवर क्लिक करा.
त्यानंतर तुम्हाला तुमचा निकाल स्क्रीनवर दिसेल.
या निकालाची प्रत डाऊनलोडही करु शकता.

# धनंजय मुंडेंनी दिली १८ तुकडे करण्याची धमकी

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २६ :
राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर करुणा शर्मा यांनी पुन्हा एकदा गंभीर आरोप केले आहेत.

करुणा शर्मा यांनी ऑक्टोबर 2020 पासून पोटगीची 60 लाखांची थकबाकी धनंजय मुंडे यांनी द्यावी यासाठी वांद्रे कोर्टात तीन अर्ज दाखल केले आहेत. तसेच धनंजय मुंडे यांच्याकडून धमक्या आणि छळ सुरूच असल्याची लेखी तक्रार करुणा शर्मा यांनी कोर्टात दिली आहे.

एका वृत्तवाहिनीशी बोलताना, स्वतः धनंजय मुंडेंनी मला 18 तुकडे करण्याची धमकी दिली असल्याचे करुणा शर्मा यांनी सांगितले आहे. लव्ह जिहादपेक्षा जास्त माज्यावर अन्याय होत असल्याचा आरोप करुणा शर्मा यांनी केला आहे.

करुणा शर्मा म्हणाल्या, मला 2 लाख पोटगी मिळाली तेव्हापासून तसेच आमदारकी रद्द होणार अशी कोर्टाकडून नोटीस आल्यापासून मला धमक्या येत आहेत. स्वतः धनंजय मुंडेंनी मला 18 तुकडे करण्याची धमकी दिली आहे. माज्याविरोधात अजूनही हिंसा सुरूच आहे. यासंदर्भात कोर्टात तक्रार दिली आहे. व्हॉट्सअप चॅट, एनसी देखील पुरावे कोर्टात दिले आहेत. पोलिसांकडे देखील तक्रार दाखल केली आहे, मात्र ते काही करत नाही.

पुढे बोलताना करुणा शर्मा म्हणाल्या, ते किती पाण्यात आहेत, हे मी दाखवून देणार आहे. एफआयआर करा असे मी सांगितले होते, पण काहीही केले नाही. मला संरक्षण द्यायला कोर्टात सांगितले आहे, मात्र अद्याप काही केले नाही.



मुलीला घेऊन जाणार अशी मला धमकी दिली जात आहे. तसेच मी पोटगी संदर्भात कोर्टात याचिका लवकरात लवकर मिळावी अशी मागणी केली आहे. मी मुख्यमंत्र्यांची वेळ मागितली आहे, त्यांनी वेळ दिला नाही. तरी मी मंत्रिमंडळ बैठकीला जाणार आहे आणि या संदर्भात त्यांच्याकडे तक्रार करणार आहे. लव्ह जिहादपेक्षा देखील अधिक जास्त माझ्यावर अन्याय होत आहे, असंही त्यांनी पुढे म्हटलं आहे.

धनंजय मुंडे हे कोर्टाच्या आदेशांना न जुमानता आपल्याला दररोज धमक्या आणि एआयच्या माध्यमातून मॉर्फ केलेले व्हिडिओ आणि फोटो पाठवून आपला छळ करत असल्याची लेखी तक्रार करूणा शर्मा यांनी कोर्टाकडे केली आहे.

माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्याकडून आणि त्यांच्या लोकांकडून आपल्याला अजुनही धमक्या आणि आता एआयच्या माध्यमातून छळ सुरूच असल्याची तक्रार करूणा शर्मा यांनी कोर्टाकडे केली आहे. तसेच कोर्टाने पोटगीबाबत दिलेल्या आदेशांनुसार 60 लाखांची वसुली आणि करूणा यांच्या मालकीच्या संपत्तीची विक्री करू नये असे आदेश देण्याची मागणी करत करूणा शर्मा यांनी कोर्टात नव्याने अर्ज केले आहेत.

# पाय तोडायचे आणि पळ म्हणायचे.. नंबर येणार कसा?

## निधी वळवण्यावरून संजय शिरसाटांचा सरकारला सवाल

■ वृत्तसंस्था, छ. संभाजीनगर, दि. ४ :
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेल्या 100 दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा मोहिमेअंतर्गत मूल्यमापनाचा निकाल जाहीर केला आहे. त्यात महिला व बाल विकास विभागाचा पहिला क्रमांक आला आहे.

यावरून शिंदे गटाचे नेते आणि सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी आपल्याच सरकारवर हल्लाबोल केला. पाय तोडायचे आणि पळ म्हणायचे, मग माज्या खात्याचा नंबर कसा येणार? असा सवाल शिरसाट यांनी निधी वळवण्यावरून सरकारला केला आहे.

लाडकी बहीण योजनेसाठी सामाजिक न्याय विभागाचा सव्वाचारशे कोटी रुपयांचा निधी वळवण्यात आल्यामुळे संजय शिरसाट यांनी नाराजी व्यक्त केली होती. सामाजिक न्याय खात्याची गरज नसेल त्या खात्यात पैसे खर्च करायचे नसतील तर खाते बंद केली तरी चालेल, अशी उद्विग्न प्रतिक्रिया शिरसाट यांनी दिली होती. आज त्यांनी पुन्हा एकदा मंत्र्यांच्या रिपोर्ट कार्डवरून सरकारवर टीका केली आहे.



अदिती तटकरेंच्या खात्याचा पहिला क्रमांक आला . आम्हाला काम करण्याची संधी मिळाली नाही. मग आमचा उल्लेख 100 दिवसांच्या उपक्रमामध्ये कसा होणार? त्यामुळे हे खातेच बंद करून टाका, एकीकडे माझे पाय तोडायचे आणि दुसरीकडे मला म्हणायचे की, पळ... तर हे शक्य होणार नाही. हा अन्याय आहे, असे संजय शिरसाट म्हणाले.

**शिंदेंना आपबीती सांगणार**

खात्याकडे निधी नसेल तर आम्ही नेमके काय काम करत आहे, हे जनतेला कसे कळणार? सरकारला कसे कळणार? असा सवाल करीत समाज कल्याण विभाग गोरगरीब जनतेला न्याय देणारे आहे. या खात्याचा निधी इतरत्र वर्ग करायला नको. मी याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी बोललो आहे. तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भेटून आपबीती सांगणार असल्याचे संजय शिरसाट यांनी सांगितले.

## थोडा निधी घेतला असेल तर हरकत नाही

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २६ :
मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेसाठी सामाजिक न्याय विभागाचा सव्वा चारशे कोटींचा निधी वळवण्यात आला. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी निधी वळवण्याला समर्थन दिले आहे.



सामाजिक न्याय विभागात ज्या जाती आहेत, त्यांच्यात लाडकी बहिणी आहेत. यामुळे काही निधी आदिवासी विभागाचा, काही निधी सामाजिक न्याय विभागाचा, काही निधी महिला आणि बाल कल्याण विभागाचा असा थोडा थोडा निधी घेतला असेल तर काही हरकत नाही, असे बावनकुळे म्हणाले.

बावनकुळे म्हणाले, संजय शिरसाट काय बोलले, याची मला माहिती घ्यावी लागेल. जेव्हा एखादी योजना चालवायची असते तेव्हा ती योजना राज्याने चालवायची असते. त्यात सामाजिक न्याय, महसूल असे वेगळे काम करत असले, तरी सामूहिक निर्णय सर्वांना लागू होतात. यासंदर्भात संजय शिरसाट यांच्याशी मी चर्चा करणार आहे.

अजित पवार, एकनाथ शिंदे यांना आपला पक्ष वाढवावा, त्याला कोणाचाही आक्षेप असणार नाही. पण सरकार म्हणून आम्ही एकत्र आहोत, महायुती प्रचंड मजबूत आहे, असे ते म्हणाले.

## ओबीसी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी मानले आमदार परिणय फुके यांचे आभार

**महासागर प्रतिनिधी**

**लाखांदूर, दि.०४ मे :** १९९० च्या दशकपासून ओबीसी संघटना जातीनिहाय जनगणना व्हावी यासाठी आग्रही होती. अखेर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जातीनिहाय जनगणना करण्याची घोषणा केली. यामुळे ओबीसी संघटनात उत्साहाचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर ओबीसी सेवा संघ तालुका लाखनीचे पदाधिकारी लाखनी येथे आमदार परिणय फुके यांच्या जनता दरबारात जाऊन त्यांचे आभार आणि अभिनंदन केले. अनेक वर्षाच्या प्रदीर्घ लढ्याला यश आले असून जातीनिहाय जनगणनेना केली जाणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या मंत्रिमंडळाने जातीनिहाय जनगणना करण्याचा निणऱ्य घेऊन लवकरच ओबीसींची जात निहाय जनगणना करू असे जाहीर केल्याने त्यांचे आभार मानण्यासाठी ओबीसी



सेवा संघ लाखनीचे तालुका अध्यक्ष उमेश सिंगनजुडे, सचिव गोपाल नाकाडे, विलास लांजेवार, यादवराव गायकवाड, रमेश रोटके, भास्कर गिऱ्हेपुंजे व देवराम फटे व इतर पदाधिकारी यांनी जातीनिहाय जनगणना व्हावी यासाठी आमदार परिणय फुके सातत्याने पाठपुरावा करीत होते म्हणून संघटनेने त्यांचे आभार मानले.

# शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटातील शेकडो कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश

## लाखनीत आ. परिणय फुके यांच्या उपस्थितीत प्रवेश सोहळा

**महासागर जिल्हा प्रतिनिधी**

**भंडारा, दि. ०४ मे :** लाखनी येथे आज आमदार आदरणीय परिणय फुके यांच्या जनतेच्या दरबारात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे भंडारा तालुकाप्रमुख ललितजी बोंद्रे आणि शहरप्रमुख आशीक चूटे यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला.

या प्रवेश प्रक्रियेमागे मुख्यमंत्री तथा भाजप नेते आदरणीय देवेंद्रजी फडणवीस यांचे मार्गदर्शन व नेतृत्व आहे.

त्यांच्या प्रशासनकालात महाराष्ट्रात विकास, गुंतवणूक, पायाभूत सुविधा, जलसंपत्ती व्यवस्थापन, शेती आणि शहरी योजनांमध्ये मोठी प्रगती झाल्याने भाजपविषयी विश्वास वाढला आहे.

***भाजप सरकारच्या योजना***

'जलयुक्त शिवार', 'स्मार्ट सिटी मिशन', 'प्रधानमंत्री आवास योजना', 'महात्मा फुले शेतकरी कर्जमाफी योजना' आणि तरुणांसाठी स्टार्टअप व रोजगाराभिमुख उपक्रम, यामुळे सामान्य जनता, शेतकरी, महिला व तरुणांचा भाजपवर विश्वास दुणावला आहे. प्रवेश घेणाऱ्या प्रमुख कार्यकर्त्यांमध्ये राजू दुबे, टोमदेव तितिरमारे, शैलेश खरोले, गंगाधर निंबार्ते, प्रमोद बोरकर, विकास बागडे, संदीप गमणे, प्रकाश गभणे, विजय धकाते, आकाश मनंदूरकर, रवी शेंडे, चंद्रकांत गिल्लोरकर, रवी सार्वे, लोकेश वैध, सचिन ठाकरे, सोमेश्वर सार्वे, रोहित मेश्राम, निकेश सतदेवे, विजय बागडे, रोहित शेंडे, अमित पाचे, विकी मेश्राम, गणेश कालेजवार यांचा समावेश आहे. या सोहळ्यात भाजपचे तालुका अध्यक्ष विजयजी लिचडे, संदीपजी मेश्राम, सचिनजी कुंभलकर (भंडारा शहराध्यक्ष), जिल्हा परिषद गटनेते विनोदजी बांते, प्रशांत खोब्रागडे, सूर्यकांत इलमे, प्रशांत निंबोलकर, आकाश फाले, उमराव सेलोकर आदी मान्यवर उपस्थित होते.

आमदार परिणय फुके व देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वावर निष्ठा ठेवून कार्यकर्ते भाजपमध्ये दाखल होत असून, भंडारा जिल्ह्याच्या विकासाच्या दिशेने हा महत्त्वाचा टप्पा ठरत आहे.



## स्व. निर्धन पाटील वाघाये महाविद्यालयात महाराष्ट्र दिन साजरा



**महासागर प्रतिनिधी**

**साकोली :** स्व. निर्धन पाटील वाघाये कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय एकोडी येथे १ मे महाराष्ट्र दिन साजरा करण्यात आला.

प्राचार्य डॉ. छत्रपाल लांबकाने यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग प्रामुख्याने उपस्थित होते.

## गोंडउमरी पोलीस चौकी येथे महाराष्ट्र दिन साजरा



**महासागर प्रतिनिधी**

**गोंडउमरी, दि.०४ मे :** येथील दिनांक सकाळी ७.०० महाराष्ट्र दिनानिमित्त पोलीस चौकीचे हेनडफॉन्स टेबल संदीप भगत यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. प्रामुख्याने उपस्थिती पोलीस शिपाई श्री नैताम, पोलीस पाटील प्रमोद गजभिये, भोजराम गोटेफोडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. गावात शांतता व सुव्यवस्था राखण्याकरिता प्रयत्न करीत असतात.

## झाडीबोलीच्या लोकगीतांची सहयाद्री वाहिनीने घेतली दखल

### मुर्झा येथील लोककलावंत सकुबाई गोंधळे येणार दूरदर्शनवर

**महासागर प्रतिनिधी**

**लाखांदूर, दि.०४ मे :** लोककला हा भारतीय संस्कृतीचा अमुल्य ठेवा आहे. अशा लोककलांना जपणाऱ्या लाखांदूर तालुक्यातील मुर्झा येथील लोककलावंत सकुबाई गोंधळे यांची मुलाखत नुकतीच दूरदर्शन केंद्रावर चित्रित करण्यात आली.

सकुबाईच्या मुलाखतीचे दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरील 'सखी सह्याद्री 'या कार्यक्रमातून दि. १३ मे २०२५ रोजी दु. १२ वाजता प्रसारण होणार आहे.

ग्रामीण भागात वेगवेगळ्या प्रसंगी गीते गायली जातात. विवाह, डोहाळे, बारसे, बाळाला जोजवणे, दळण, कांडण, रोवणे अशा प्रसंगी गायल्या जाणाऱ्या गीतांना लोकगीते असे म्हणतात. काळाच्या ओघात ही गीते लुप्त होऊन आपली संस्कृती नष्ट होते की काय अशी भिती निर्माण झालेली आहे. पण आज सुद्धा ही लोकगीते टिकावे, पुनरुज्जीवित व्हावेत, पुढील पिढीपर्यंत पोचावे यासाठी प्रयत्न करणारे, लोकगीताचे जतन, संवर्धन व्हावे यासाठी धडपडणारे एक नाव म्हणजे सकुबाई गोधळे. सकुबाई गोंधळे यांनी जपलेल्या लोकगीतांची दखल दूरदर्शनने घेतली.

त्यांना २ मे रोजी दूरदर्शन केंद्रावर बोलावून त्यांची मुलाखत चित्रित करण्यात आली. मुलाखतीदरम्यान सकुबाईंनी लोकगीते गायली. लोककथा सांगीतल्या.

तसेच झाडीबोली म्हणी, जीकावाच्या कला सादर केल्या. लोकगीतांचे तालासुरात गायन, सुरवर गळा, मधुर-मंजुळ स्वर यामुळे



कार्यक्रमाच्या निर्मात्या मीनल पाठराबे, मुलाखतकार राखी पाटील आणि दूरदर्शनचे सर्व तंत्रज्ञ, कर्मचारी यांनी सकुबाईचे विशेष कौतुक केले सकुबाईचे सुपुत्र कुंजीराम गोंधळे हे कवी, लेखक व समिक्षक असून ते आपल्या आईच्या कार्याला प्रोत्साहन देण्याचे काम करतात.

सकुबाई गोंधळे यांनी आतापर्यंत आकाशवाणी नागपूर, महासंस्कृती महोत्सव भंडारा, अनेक झाडीबोली साहित्य संमेलने यांसारख्या अनेक साहित्यिक आणि सांस्कृतिक व्यासपीठांवरून लोकगीतांचा प्रचार व प्रसार केला आहे.

सकुबाईनी या यशाचे श्रेय झाडीबोली चळवळ, बोलीमहर्षी डॉ हरिश्चंद्र बोरकर, मार्गदर्शक शकुंतला वंजारी यांना दिलेले आहे. सकुबाईंच्या या कार्याबद्दल झाडीच्या बहिणाबाई अंजनाबाई खुणे, संतकवी डोमा महाराज कापगते, शाहीर लोकराम शेंडे, ग्रामगीताचार्य बंडोपंत बोढेकर, कवी मुरलीधर खोटेले, पत्रकार ताराचंद कापगते, कवी लक्ष्मण खोब्रागडे, कवी अरूण झगडकर, कवी दिनेशकुमार अंबादे, समाजसेविका छाया बोरकर, युवा उद्योजक सचिन ब्राम्हणकर यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## उन्हाळी शिबिराचे आयोजन

**महासागर प्रतिनिधी**

**साकोली, दि.०४ मे :** विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, त्यांच्या बुद्धीमत्तेला चालना मिळावी ह्यासाठी अकॅडमिक हाईटस पब्लिक स्कुल (एकोडी रोड)साकोली येथे उन्हाळी शिबिराचे आयोजन करण्यात आले. अकॅडमिक हाईट्स पब्लिक स्कूल आज त्यांच्या बहुप्रतिक्षित उन्हाळी भरलेल्या फन ॲक्टिव्हिटी कॅम्पच्या सुरुवातीची घोषणा करताना आनंदित आहेत.

हे शिबिर दि.३ मे ते १६ मे २०२५ पर्यंत सुरू राहील वेळ: सकाळी ६:३० ते १०:३० या शिबिरात योग आणि ध्यान, क्रीडा कौशल्य तायक्वांडो, नृत्य, संवाद कौशल्य, कलाआणि हस्तकला, भाषीक ज्ञान यासह विविध आकर्षक उपक्रमांचा समावेश असेल. पहिल्या दिवशी १७ विद्यार्थ्यांनी शिबिरासाठी नोंदणी केली आणि बरेच विद्यार्थी अपेक्षित आहेत. प्राचार्य डॉ.संचिता



ब्रह्मचारी यांनी सरस्वतीच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून शिबिराचे उद्घाटन केले. शिबिरासाठी प्रशिक्षक आहेत:- प्रवीण कठाणे - तायक्वांडो, क्रिकेट रोहित सेलोकर- योग आणि ध्यान, फुटबॉल, व्हॉलीबॉल निखिल निंबेकर -नृत्य, अलवीया पठाण -कला आणि हस्तकला डॉ. संचिता ब्रह्मचारी- संवाद कौशल्य. हे शिबिर विद्यार्थ्यांसाठी एक आकर्षक आणि समृद्ध अनुभव असण्याचे आश्वासन देते, ज्यामध्ये विविध उपक्रम, कार्यशाळा आणि शिकण्याच्या संधी उपलब्ध होतील ए.एच.पि.एस.विद्यार्थ्यांच्या अधिक प्रवेशिका आमंत्रित करित आहे आणि त्यांचा उन्हाळा एक हिट आणि आश्चर्यकारक बनवते.

## पंडित जवाहरलाल नेहरू कॉन्व्हेन्ट व प्राथमिक शाळा सानगडी येथे निकाल जाहीर

**महासागर प्रतिनिधी**

**सानगडी, दि. ०४ मे :** संत नरहरी शिक्षण संस्था साकोली द्वारा संचालित मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा पुरस्कार प्राप्त पंडित जवाहरलाल नेहरू कॉन्व्हेन्ट व सेमी इंग्रजी प्राथमिक शाळा सानगडी येथे सत्र अखेरचा निकाल जाहीर करण्यात आला. यात सर्व प्रथम सावित्रीबाई फुले व सरस्वती माता यांच्या प्रतिमेचे पूजन करून माल्यार्पण करण्यात आले व कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक व मुख्याध्यापक सुरेश लांजेवार हे होते तर उपाध्यक्ष म्हणून छत्रपाल वालोदे हे होते. प्रमुख उपस्थिती मध्ये माता पालक संघाच्या उपाध्यक्ष रुपाली बारापात्रे, पालक संघाच्या सदस्य भूमेश्वरी बावनकर, सदस्य लोकेश शेंडे, अनमोल हर्षे, सखी सावित्री समिती च्या सदस्य दीक्षा जनबंधू, वच्छला निमजे, लक्ष्मी धकाते, शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष विठ्ठल रोकडे, माजी प्राचार्य नारायण शेंडे, शाळा समितीचे राजकुमार नागरीकर, सदस्य चित्ररेखा श्रीरंगे, मुदस्सिर खान पठाण, राकेश सूरजबंशी, संदीप रोकडे, सदस्य मेंढे मॅडम हे होते. सर्व प्रथम केजी वन ते इयत्ता चौथी पर्यंतच्या सर्व




विद्यार्थ्यांचा निकाल श्रेणीनुसार घोषित करण्यात आला व प्रथम, द्वितीय श्रेणीत आलेल्या विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ व भेट वस्तू देण्यात आले.

या प्रसंगी पालक संघाच्या उपाध्यक्ष रुपाली बारापात्रे, दीक्षा जनबंधू, विठ्ठल रोकडे, नारायण शेंडे, छत्रपाल वालोदे, राजकुमार नागरीकर यांनी प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले व पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या व ज्या विद्यार्थ्यांनी प्राविण्य प्राप्त केले नाही त्यांनी खचून न जाता जास्तीत जास्त प्रयत्न करून आपण सुद्धा प्राविण्य प्राप्त करून यशाचे शिखर गाठावे ह्या शब्दात त्यांचे मनोबल वाढविले.

अध्यक्षीय भाषणातून मुख्याध्यापक सुरेश लांजेवार यांनी सर्व विद्यार्थीना शुभेच्छा दिल्या व यापुढेही असेच यश संपादन करून आपले व आपल्या आई वडिलांचे नाव उज्ज्वल करा अशा शब्दरूपी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ज्योती कुंभारे, भारती रोकडे, मीना गोटेफोडे, सुनीता नंदनवार, कला धकाते व सर्व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे संचालन चंदा रोकडे व आभार राजाबाई मेश्राम यांनी मानले.

## युवकाची गळफास लागून आत्महत्या

**महासागर प्रतिनिधी**

**गोंडउमरी, दि.०४ मे :** साकोली तालुक्यातील चिचटोला पळसगाव येथील नितेश रामकृष्ण राऊत वय ३० वर्ष असून शेत शिवारातील आंब्याच्या झाडाला नायलॉन दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली.

दिनांक ३०/०४/२०२५ ला १२.१२ ते दीडच्या सुमारास ही घटना घडवून आली असून युवक सिकलसेल आजार असल्याने आजाराला कंटाळून गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. पोलीस हवालदार महादेव मडावी कलम १९४ भा.ना.सु.रा.व गुन्हा दाखल करण्यात आला आहेपुढील तपास अधिकारी संदीप भगत तपास करीत आहे.

## श्री सुधाकर रामाजी कावळे यांचे निधन



**भंडारा :** श्री सुधाकर रामाजी कावळे रा. रामायण नगरी, खात रोड, भंडारा येथील निवासी (७६) आज दिनांक ०४/०५/२०२५ रोजी देवाज्ञा झाली. त्यांची अंतिम यात्रा त्यांच्या निवास स्थानावरून दिनांक ०५/०५/२०२५ ला सायं. ०४.३० वाजता निघेल. त्यांच्या पार्थिवावर वैनगंगा मोक्षधाम येथे अंतिम संस्कार करण्यात येईल.

## गायखुरी देवस्थानात १२ वर्षानंतर खुरीचे दर्शन, देवस्थानात पोहचले भाविक

### नदीच्या पात्रात पाणी असल्याने धोका कायम

**महासागर प्रतिनिधी**

**सिहोरा, दि. ०४ मे :** वैनगंगा आणि बावनथडीच्या संगम भागात असणाऱ्या गायखुरी देवस्थानात सलग १२ वर्षानंतर गाईच्या खुरीचे दर्शन भाविकांना झाले आहे. काही भाविक व सामाजिक कार्यकर्ते या देवस्थानात पोहचले आहेत. वृत्तपत्रांनी सातत्याने अपडेट घेतल्यानंतर भाविकांचे नजरा देवस्थानात लागले होते. देवस्थानच्या चौफेर पाणी असल्याने धोका कायम असल्याचे सांगितले जात आहे.

मे महिन्यात देवस्थान धोक्याचे बाहेर निघणार आहे. नदीच्या पात्रातून पायदळ प्रवास सुरू झाला असला तरी पात्रात डोह पडले असल्याचे सांगितले जात आहे. वैनगंगा नदीवरील वांगी गावाचे शेजारी बांधकाम करण्यात आलेल्या धरणात पाणी अडविण्यात आल्याने बपेरा गावाचे हद्दीत असणारे नदीच्या मध्य भागातील गायखुरी देवस्थान पाण्याखाली आले होते. गेल्या १२ वर्षापासून देवस्थान पाण्याखाली असल्याने दुरूनच भाविक दर्शन घेत होते. महाशिवरात्री यात्रेचे आयोजन नदीच्या काठावरील शिव पार्वती देवस्थानात करण्यात येत होते. आधीपासून नदीच्या पात्रात गायखुरी देवस्थानात यात्रेचे आयोजन होत असताना पाणी अडविण्यात आल्याने यात्रा उत्सव बंद करण्यात आली आहे. दरम्यान गोंदिया जिल्ह्यातील धापेवाडा उपसा सिंचन प्रकल्प टप्पा १ आणि २ प्रकल्पात पाण्याचा उपसा वाढविण्यात आल्याने नदीच्या पात्रातील जलसाठा कमी होऊ लागले. पात्रातील जलस्तर घटल्याने गायखुरी देवस्थानातील खांब दृष्टीस पडले. यानंतर भाविकांच्या दर्शनासाठी अपेक्षा वाढत गेल्या आहे. वृत्तपत्रांनी सातत्याने अपडेट घेण्यास सुरुवात केली आहे. भाविकांचे दारात माहिती पोहचविण्यासाठी वृत्तपत्रांनी सातत्याने वृत प्रकाशित केले आहे. गेल्या महिनाभरापासून वृत्त प्रकाशित करताना देवस्थानात जाण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. एप्रिल महिन्यात देवस्थानातील चबुतरा दृष्टीस पडल्यानंतर गायखुरी देवस्थानात श्रधेचे स्थान असणारे दगडावरील कोरलेले गाईच्या खुरी पाण्याखाली होते. नदीच्या पात्रातील पाण्याचा उपसा सुरू असल्याने आता कोरलेले दगड




दोन नदीच्या संगम भागात गायखुरी कोरलेले दगड

बाहेर पडले आहेत. गायखुरी देवस्थान पूर्णतः मोकळा झाला आहे. दगडावर कोरलेल्या गाईच्या खुरी सलग १२ वर्षानंतर दृष्टीस पडल्या आहेत. दीर्घ कालावधीनंतर भाविक गायखुरी देवस्थानात पोहचले आहेत. नदीच्या पात्रातील पाण्याचा अंदाज भाविकांना नाही. यामुळे या देवस्थानात सामाजिक कार्यकर्ते सचिन खंगार यांनी पहिल्यांदा हजेरी लावली. देवस्थानच्या परिसरातील पाण्याचा अंदाज घेण्यास सुरुवात केली आहे. गेली अनेक वर्षे देवस्थान पाण्याखाली असल्याने नदीच्या पात्रात डोह पडले आहे. खोल डोह असल्याने सरसकट देवस्थानात दर्शनासाठी हजेरी लावणे धोकादायक असल्याचे दिसून येत आहे. नदीचे पात्र पायदळ प्रवासासाठी खुला झाला असला तरी खडकाळ भागात पाणी आहे. तोल गेल्यास धोकादायक आहे. मे महिन्यात नदी पात्रातील पाणी कमी करण्यात येणार आहे. या महिन्यात धोका राहणार नसल्याचे सांगितले जात आहे. यामुळे भाविकांनी दर्शनासाठी घाई करू नये. अशा सूचना दिल्या जात आहेत.

***चबुतराचे चौफेर ५ फूट पाणी***

:- सध्या देवस्थानात जाण्यासाठी दगडावरून जावे लागत आहे. गायखुरी देवस्थानचा चबुतरा बाहेर पडला असला तरी चौफेर ५ फूट पाणी आहे. यामुळे दर्शनासाठी जाताना धोकादायक झाले आहे. नदीचे पात्र रिकामे होत असताना भाविकांनी दर्शनासाठी जोखीम पत्करण्याचे प्रयत्न करू नये. गायखुरी कोरलेला दगड डोहाचे शेजारी असून ५ फूट पाण्याने वेढलेला आहे. देवस्थानचे चबुतरा पर्यंत जाता येतो. परंतु गाईच्या खुरी पर्यंत जाणे धोकादायक असल्याचे सामाजिक कार्यकर्ते सचिन खंगार यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

**जाहिर नोटीस**
**कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, भंडारा.**

**सक्शेसन के.क्रं.७/ २०२५**

**अर्जदार :-** १) श्रीमती वैशाली योगेश निनावे
वय ४४ वर्षे, कामधंदा - घरकाम,
२) कु. खुशबु योगेश निनावे
वय २३ वर्षे, कामधंदा - शिक्षण
३) रोहीत योगेश निनावे
वय २१ वर्षे, कामधंदा - शिक्षण
सर्व रा.हनुमान मंदिरजवळ, संजय गांधी वार्ड, भंडारा, तह.जि.भंडारा.

--- विरूध्द ---

**गैरअर्जदार :-** **निरंक**

की, अर्जदार क्रं. १ चे पती व अर्जदार क्रं. २ व ३ चे वडील मृतक योगेश केशवराव निनावे यांचा मृत्यू दि. १८/०६/२०१७ रोजी झाला. तसेच मृतक योगेशची आई कुसूम केशवराव निनावे हिचा मृत्यू दि. ३१/०३/१९९१रोजी झाला. मृतक योगेशचे वडील केशवराव निनावे यांचा मृत्यू दि. २२/०४/२०१७ रोजी झाला. त्यामुळे अर्जदार क्रं. १ ते ३ हे कायदेशीर वारस असल्यामुळे मृतक योगेश निनावे यांच्या चल अचल संपत्तीवर व बँकेत जमा असलेल्या रक्कमेवर तसेच महसुल अभिलेखावर नांव चढविण्याकरीता वारसान प्रमाणपत्र / उत्तराधिकारी प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदार क्रं. १ ते ३ नी सदर अर्ज विद्यमान कोर्टात दाखल केली आहे.

सदर प्रकरण प्रलंबित असुन प्रकरणाची पेशी तारीख **१७/ ०६ /२०२५** आहे. सबब ज्यांना सदर प्रकरणावर काहीही आक्षेप किंवा उजर घ्यायचे असेल त्यांनी पेशी तारखेवर विद्यमान कोर्टात हजर राहून आपला उजर दाखल करावा अन्यथा अर्जदारांतर्फे एकतर्फा आदेश पारीत केल्या जाईल.

करीता आज दि. २१/०४/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाचे शिक्यानिशी ही जाहीर नोटीस प्रकाशित केली आहे.

**भंडारा** **आदेशान्वये**
**दि. २१/०४/२०२५** **सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायाधिश व स्तर, भंडारा.**

RNI No.- MAHAMAR-2010/35801
महासागर भंडारा
**मालक, मुद्रक, प्रकाशक** - श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर -१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, गांधी चौक समोर, भंडारा येथे प्रकाशित केले. **संपादक**- श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन -०७१२-२७६७६२८- ९३७३११७०४२ * स्थानिक संपादक-**सुरेश लक्ष्मण कोटगले,** फोन -८७९३१९१२१३ * (पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांचेवर राहील.)

THIS IS A PUBLIC ANNOUNCEMENT FOR INFORMATION PURPOSES ONLY AND IS NOT A PROSPECTUS ANNOUNCEMENT. THIS DOES NOT CONSTITUTE AN INVITATION OR OFFER TO ACQUIRE, PURCHASE OR SUBSCRIBE TO SECURITIES.
THIS PUBLIC ANNOUNCEMENT IS NOT INTENDED FOR PUBLICATION OR DISTRIBUTION, DIRECTLY OR INDIRECTLY OUTSIDE INDIA

virtualgalaxy™

# VIRTUAL GALAXY INFOTECH LIMITED

Scan this QR code to view the RHP

CIN: U93000MH1997PLC110645

Our Company was originally incorporated under the name *"Virtual Galaxy Infotech Private Limited"* under the provisions of the Companies Act, 1956 vide Certificate of Incorporation dated September 12, 1997, issued by the Registrar of Companies, Mumbai, Maharashtra. Subsequently, the status of the Company was changed to public limited and the name of our Company was changed to *"Virtual Galaxy Infotech Limited"* vide Special Resolution passed by the Shareholders at the Extra Ordinary General Meeting of our Company held on September 14, 2024. The fresh certificate of incorporation consequent to conversion was issued on September 12, 2024, by Registrar of Companies, Centralised Processing Centre. The Corporate Identification Number of our Company is U93000MH1997PLC110645. For further details, please refer to chapter titled *"History and Corporate Structure"* beginning on page 191 of the Red Herring Prospectus.

**Registered Office:** 3, Central Excise Colony, Behind Mahatme Eye Bank, Chhatrapati Sq., Ring Road, Nagpur, Maharashtra, India, 440015;
**Tel No:** + 91 9226531342 | **E-mail:** investors@vgipl.in | **Website:** www.vgipl.com ;
**Contact Person:** Ms. Anjali Vinay Padhye Company Secretary and Compliance Officer

## THE PROMOTERS OF OUR COMPANY ARE AVINASH NARAYANRAO SHENDE AND SACHIN PURUSHOTTAM PANDE

**"THE ISSUE IS BEING MADE IN ACCORDANCE WITH CHAPTER IX OF THE SEBI ICDR REGULATIONS (IPO OF SMALL AND MEDIUM ENTERPRISES) AND THE EQUITY SHARES ARE PROPOSED TO BE LISTED ON EMERGE PLATFORM OF NSE ("NSE EMERGE")."**

## THE ISSUE

**INITIAL PUBLIC OFFER OF 65,70,000* EQUITY SHARES OF FACE VALUE OF ₹10/- EACH (THE "EQUITY SHARES").**

***Subject to finalisation of basis of allotment.***

**DETAILS OF THE SELLING SHAREHOLDERS, OFFER FOR SALE AND WEIGHTED AVERAGE COST OF ACQUISITION - Not Applicable as the entire issue constitutes fresh issue of equity shares.**

## PRICE BAND: ₹ 135/- to ₹ 142/- PER EQUITY SHARE

**THE FLOOR PRICE IS 13.5 TIMES THE FACE VALUE AND CAP PRICE IS 14.2 TIMES OF THE FACE VALUE OF THE EQUITY SHARES.**
**BIDS CAN BE MADE FOR A MINIMUM OF 1,000 EQUITY SHARES AND IN MULTIPLES OF 1,000 EQUITY SHARES THEREAFTER.**
**THE PRICE TO EARNING RATIO BASED ON DILUTED EPS FOR FY 2023-24 AT THE FLOOR PRICE IS 13.66 TIMES AND AT THE CAP PRICE IS 14.37 TIMES.**

## ISSUE PROGRAM

**ANCHOR BID OPENS ON THURSDAY, MAY 08, 2025**
**OPENS ON: FRIDAY, MAY 09, 2025**
**CLOSES ON: WEDNESDAY, MAY 14, 2025**

*Our Company is a SaaS product focused company engaged in providing Core Banking Software Solution, IT Solutions, ERP Implementation and Customized Software Solutions Development, IT services for the BFSI, ERP, and E-Governance domains. We are primarily involved in the development, customization, installation, and implementation of software applications, along with comprehensive post-implementation support, monitoring, and maintenance services for the delivered solutions. To provide a seamless experience to our clients, we offer a range of essential allied services, ensuring that all software needs are met under one roof. Our wide array of offerings covers the entire lifecycle of services, including consultation, architecture, solution design, implementation, monitoring, and managed services. For more details, please refer chapter titled "Our Business" beginning on page 158 of the Red Herring Prospectus.*

## ALLOCATION OF THE ISSUE

| | |
|---|---|
| QIB PORTION | NOT MORE THAN 50.00% OF THE NET ISSUE |
| INDIVIDUAL PORTION | NOT LESS THAN 35.00% OF THE NET ISSUE |
| NON-INSTITUTIONAL PORTION | NOT LESS THAN 15.00% OF THE NET ISSUE |
| MARKET MAKER PORTION | UPTO 3,36,000 EQUITY SHARES OR 5.11% OF THE ISSUE |

**IN MAKING AN INVESTMENT DECISION, POTENTIAL INVESTORS MUST ONLY RELY ON THE INFORMATION INCLUDED IN THE RED HERRING PROSPECTUS AND THE TERMS OF THE ISSUE, INCLUDING THE RISKS INVOLVED AND NOT RELY ON ANY OTHER EXTERNAL SOURCES OF INFORMATION ABOUT THE OFFER AVAILABLE IN ANY MANNER.**

**The price band is justified based on the qualitative factors, quantitative factors and KPIs disclosed in the chapter titled "Basis for Issue Price" beginning on page 133 of Red Herring Prospectus.**

### RISKS TO INVESTORS

1. **Risk to Investors: Summary description of key risk factors based on materiality.**
   a. *Substantial portion of our revenues has been dependent upon our Core Banking software i.e. E-Banker. The loss of any one or more of our major clients would have a material effect on our business operations and profitability.*
   b. *We depend on orders from the banks, government and private sector clients for majority of our revenue, which may expose us to risk. Additionally, the loss of or inability to qualify for such orders may adversely affect our business, financial condition, results of operations and prospects.*
   c. *We derive a significant portion of our revenue from customers located in Maharashtra. Any adverse developments in the region could adversely affect our business, results of operations, cash flows and financial condition.*
   d. *Our revenues are dependent on clients concentrated in the BFSI segment. An economic slowdown or factors affecting this segment may have an adverse effect on our business, financial condition and results of operations.*
   e. *Most projects we operate have been awarded primarily through a competitive bidding process and our financial performance is largely dependent on our successful bidding for new projects. We may not always be able to qualify for, compete and win projects. If we are not able to successfully bid for new projects, it may adversely affect our business operations and financial conditions.*
2. **Details of suitable ratios of the company and its peer group for the latest full financial year.**

| Particulars | CMP (₹) | Face Value (₹) | EPS (₹) | | PE Ratio (times) | | RoNW (%) | NAV per Share (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Basic | Diluted | Basic | Diluted | | |
| Virtual Galaxy Infotech Limited | [●] | 10 | 9.88 | 9.88 | [●] | [●] | 39.82 | 24.81 |
| **Peer Group** | | | | | | | | |
| Veefin Solutions Limited | 330.10 | 10 | 2.74 | 2.51 | 120.47 | 131.51 | 6.95 | 52.70 |
| Network People Services Technologies Limited | 2,291.70 | 10 | 13.78 | 13.76 | 166.30 | 166.54 | 62.04 | 29.67 |
| Trust Fintech Limited | 78.50 | 10 | 7.13 | 7.13 | 11.00 | 11.00 | 34.58 | 25.71 |

***Source: www.nseindia.com and www.bseindia.com*

***Notes:***

*(1) The figures for our company are based on Standalone Restated Financial Statements for the year ended March 31, 2024 after considering the bonus issue.*
*(2) The figures for the Peer Group are based on the Standalone Financial Statements filed for the financial year ended March 31, 2024.*
*(3) P/E Ratio has been computed based on their respective closing market price on May 02, 2025, as divided by the Basic EPS and Diluted EPS as on March 31, 2024.*
*(4) CMP is the closing prices or the last traded price of respective scripts as on May 02, 2025.*
*(5) The peer group companies are not exactly comparable in all aspects of business and services that our Company provides.*

**सिहोरा , दि. ०४मे :** महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पार्टी यांचे सूचनेनुसार व भंडारा जिल्हा भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष प्रकाश बाळबुद्धे यांचे आदेशानुसार दिनांक २७ रोज रविवारला जय हिंद सार्वजनिक वाचनालय सिहोरा नगरातील चारही बूत चे गाव वस्ती जनसंपर्क अभियान कार्यक्रम राबविण्यात आले. या कार्यक्रमात गावातील अंगणवाडी, मंदिर, सामाजिक सभागृह या ठिकाणी बैठका घेण्यात घेऊन केंद्र शासनाच्या तसेच राज्य शासनाच्या योजनेची माहिती जनतेला देण्यात आली. केंद्र शासन राबवीत असलेल्या तसेच राज्य शासनाद्वारा राबवीत असलेल्या योजनेच्या लाभ जनतेने घ्यावा व ही माहिती घरोघरी पोहोचावे, अशी विनंती भारतीय जनता पार्टीचे भंडारा जिल्हा सचिव गजानन यांनी केली आहे. या कार्यक्रमात प्रामुख्याने उपस्थित भारतीय जनता पक्षाचे जिल्हा सचिव तसेच सिहोरा पंचायत समिती संपर्कप्रमुख गजानन निनावे, सह संपर्कप्रमुख दिनेश कामथे, जिल्हा परिषदेचे माजी सभापती धनेंद्र तुरकर, सरपंच सौ. रंजना तुरकर, माजी सरपंच कालिदास कुंभारे, उपसरपंच सलाम शेख, भारत चौधरी, दिनेश तुरकर, रवी वासनिक, दामू नंदनवार, धनेंद्र नेवारे, अरविंद पटले, पप्पू पारधी, सतीश पटले, तेजराम ठाकरे, बालू बिसने, छत्रपती तुरकर, अनिल रीनायते, विनोद गौतम, डॉ. रॉय, तेजस्वर टेंभरे, गरीबदास निनावे, प्रकाश कुंभारे, नरेश बोकडे, दसाराम निकुळे तसेच पक्षाचे प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते मंच संचालन अरविंद पटले यांनी केले, आभार प्रदर्शन उपसरपंच सलाम भाई शेख यांनी केले. पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हमला मध्ये जे निरपराधी बळी पडले त्यांना श्रद्धांजली वाहून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# लाखांदूर : ६२ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाची आरक्षण सोडत

**महासागर प्रतिनिधी**

**लाखांदूर , दि. ०४मे :** तालुक्यातील ६२ ग्रामपंचायतींच्या गाव कारभार पाहणाऱ्या सरपंचपदाची आरक्षण सोडत करण्यात आली. ही आरक्षण सोडत ३ मे रोजी सकाळी १० वाजताच्या सुमारास लाखांदूर येथील तहसील कार्यालयात करण्यात आली.

ही आरक्षण सोडत लाखांदूरचे तहसीलदार वैभव पवार यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आली.

६२ ग्रामपंचायतींपैकी ३३ ग्रामपंचायती महिलांकरिता राखीव ठेवण्यात आल्या आहेत. अनुसूचित जाती प्रवर्गासाठी ११ ग्रा. पं. आरक्षित असून त्यापैकी ६ ग्रा. पं. महिलांसाठी आरक्षित आहेत.

अनुसूचित जमातीसाठी ३ ग्रा. पं. आरक्षित त्यापैकी २ पदे महिलांसाठी आरक्षित आहेत. नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी १७ ग्रा. पं. आरक्षित ठेवले असून त्यापैकी ९ ग्रा. पं. महिलांसाठी आरक्षित आहेत.

तर सर्वसाधारण (खुल्या) प्रवर्गासाठी ३१ ग्रामपंचायती आरक्षित असून त्यापैकी १६ ग्रामपंचायती ह्या महिलांसाठी आरक्षित ठेवण्यात आले आहेत. महिलांसाठी ठेवल्या राखीव.

***३३ ग्रामपंचायती असे आहे आरक्षण***


**अनुसूचित जाती प्रवर्ग :** खैरी/घर, विरली खुर्द, भागडी, चप्राड, दहेगाव. अनुसूचित जमाती प्रवर्ग : चिकना नागरिकांचा मागास प्रवर्ग : सोनेगाव, चिचाळ-कोदामेंडी, साखरा, दिघोरी मोठी, मुर्झा, परसोडी नाग, ईटान, सोनी/इंदोरा. सर्व साधारण (खुला) प्रवर्ग : पाचगाव, पाऊलदवना, गुंजेपार/ किन्ही, खोलमारा, जैतपूर, तावशी, बोथली, कोच्छी/दांडेगाव, आसोला, ढोलसर, विरली बु, कुडेगाव, मांदेडी/सावरगाव, डांभेविरली, विहीरगाव. अनुसूचित जाती महिला: पुयार , नांदेड, मांढळ, बारव्हा, मानेगाव/ बोरगाव, चिचोली/ अंतरगाव.

**अनुसूचित जमाती महिला :** कन्हाळगाव/चिचगाव, ओपारा. नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला : बेलाटी, मासळ, तई बु, पारडी, धर्मापुरी, करांडला, खैरणा, मडेघाट, पिंपळगाव/को.

सर्वसाधारण महिला : तिरखुरी,पालेपेंढरी, पेंढरी, हरदोली, मुरमाडी, पाहुणगाव, आथली, सरांडी बु, डोकेसरांडी, राजनी, किरमटी, दोनाड, रोहनी, मोहरणा, गवराळा, खैरी/पट.

# प्रादेशिक पाणीपुरवठा योजना जाणार पडद्याआड !

## जलकुंभावर जल जीवन मिशनचा ताबा : केला फक्त तगरंगोटीवर खर्च



**महासागर प्रतिनिधी**

**सिहोरा :** नागरिकांना जलशुद्धीकरण आणि प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या माध्यमातून शुद्ध पाणी उपलब्ध करण्यासाठी सुकळी नकुल प्रादेशिक पाणी पुरवठा बपेरा गावाचे हद्दीत तयार करण्यात आली. योजनेची जलवाहिनी जिल्हा परिषद क्षेत्रातील प्रत्येक गावात देण्यात आली.

या योजनेचे अभिनव जलकुंभ निर्माण करण्यात आली. गुंडभर पाणी योजनेने नागरिकांना दिले नसताना योजनाच गुंडाळण्यात आली आहे. या योजनेच्या जलकुंभावर जल जीवन मिशनने ताबा घेतला आहे. प्रादेशिक पाणी पुरवठा योजना पडद्याआड गेल्याचा प्रकार निदर्शनास आला आहे.

बपेरा जिल्हा परिषद क्षेत्रातील गावांना शुद्ध पाणी पुरवठा करण्यासाठी सुकळी नकुल प्रादेशिक पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात आली आहे.


योजनेला जागा मिळाली नसल्याने बपेरा गावाचे हद्दीत ही योजना साकारण्यात आली आहे. योजनेला जलशुद्धीकरण केंद्र असल्याने जिल्हा परिषद क्षेत्रातील देवरी देव, सुकळी नकुल, बपेरा, देवसर्रा, बिनाखी, गोंडीटोला, ब्राहमणटोला, महालगाव, वारपीडकेपार, सोंड्या, गावात जलवाहिनी घालण्यात आली. या योजनेचे गावात अभिनव जलकुंभ तयार करण्यात आले.

जलवाहिनी आणि जलकुंभ बांधकामावर कोट्यवधी खर्च करण्यात आले. बावनथडी नदीवर पंपगृह देण्यात आले. योजनेपासून गावांचे अंतर १२ किमीवर असल्याने विलंब पाणीपुरवठा करण्याची अपेक्षा गावकऱ्यांना होती. परंतु झाले उलटेच कोट्यवधी खर्चुनही योजनेचे पाणी गावात पोहचले नाही.

पुन्हा गावकऱ्यांना मुबलक पाणीपुरवठा करण्यासाठी जलजीवन मिशन हर घर नल योजना गावात मंजूर करण्यात आली. परंतु या योजनेने नागरिकांचा विश्वास संपादन केला नसल्याने सर्वेक्षण करताना गावात विरोध होऊ लागला आहे. गावातील नळ योजनाच बरी, असे ठणकावून सांगितले आहे. परिसरात बहुतांश गावात जल जीवन मिशन हर घर नल योजना देण्यात आली आहे. गेल्या वर्षभरापासून एक थेंब पाणी नागरिकांचे दारात पोहचले नाही. जल जीवन मिशन हर घर नल योजनेच्या प्रस्तावित कामाची विभागीय चौकशी करण्याची ओरड सुरू झाली आहे.

***तरीही गावकरी तहानलेलेच ! :-***

नागरिकांना पाणी पुरवठा करण्यासाठी प्रादेशिक पाणी पुरवठा योजना, ग्रामीण पाणी पुरवठा योजना, जल जीवन मिशन हर घर नल योजना अशा योजना राबविण्यात आलेल्या आहेत. परंतु योजना नागरिकांना मुबलक पाणी पुरवठा करू शकल्या नाहीत, विशेषतः जल जीवन मिशन हर घर नल योजना वादग्रस्त ठरली आहे.



# चंद्रावरच्या पाण्याचे उलगडले कोडे

चंद्रावर पाणी कसे असू शकते, याबद्दल अनेक दशकांपासून शास्त्रज्ञ गोंधळून गेले आहेत. चंद्रावरील हवामान कोरडे आहे. तेथे वारा नाही. वातावरणाचा अभाव आहे. यामुळेच चंद्रावर पाण्याच्या अस्तित्वाचे गूढच राहिले आहे. गेल्या अनेक वर्षांत यावर बरेच संशोधन झाले आहे. काही संशोधनात यामागे सूक्ष्म उल्का हे कारण असल्याचे सांगण्यात आले. त्याचवेळी आणखी एका संशोधनाने येथील पुरातन खड्ड्यांमध्ये साचलेल्या पाण्याच्या साठ्याकडे लक्ष वेधले.

अमेरिकन स्पेस एजन्सी 'नासा'ने नुकत्याच केलेल्या संशोधनात या प्रश्नाचे उत्तर दिले असून पूर्वीची उत्तरे पूर्णपणे नाकारली आहेत. सौर वारे थेट चंद्राच्या मातीत पाणी तयार करू शकतात, असे 'नासा'च्या संशोधनात म्हटले आहे. 'नासा'च्या गोडार्ड स्पेस फ्लाइट सेंटरमधील संशोधन शास्त्रज्ञ ली सिया येओ आणि त्यांच्या टीमने हे संशोधन केले आहे. चंद्रावर असणाऱ्या पाणीविषयक प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी शास्त्रज्ञांनी एक वास्तववादी सिम्युलेशन तयार केले आणि सौर वाऱ्याचा चंद्रावर कसा परिणाम होतो हे समजून घेण्याचा प्रयत्न केला.

'नासा'चे संशोधक जेसन मॅक्लेन म्हणाले की, संशोधनासाठी चंद्राचे डुप्लिकेट वातावरण तयार करण्यात आले होते. तेथे वारा नव्हता. यासाठी एक अनोखे चेंबर वापरले गेले आणि त्यातून सौर बीम पार केला गेला. अशाप्रकारे व्हॅक्यूम परिस्थिती तयार केली गेली आणि एक रेणू शोधक वापरला गेला. मॅक्लीन म्हणतात की, या संशोधनासाठी ऑपरेटर्स डिझाइन करण्यासाठी बराच वेळ लागला पण त्याचा फायदा झाला. यानंतर याचा सौर वाऱ्याशी विशेष संबंध असल्याचे आढळून आले. या प्रयोगादरम्यान, १९७२ मध्ये 'नासा'च्या अपोलो मिशन १७ दरम्यान चंद्रावरून आणलेल्या मातीचा नमुना वापरण्यात आला.

चंद्रावर पाणी कसे आले?

सूर्यामुळे चंद्रापर्यंत पाणी कसे पोहोचले याविषयी शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे, की सूर्याची किरणे चंद्रावर पाण्याच्या अस्तित्वाशी जोडलेली आहेत. सौर वारे वाहतात आणि सौर वाऱ्याचे प्रोटॉन चंद्राच्या पृष्ठभागावर आदळतात तेव्हा त्यांना कोणत्याही प्रतिकाराचा सामना करावा लागत नाही. पृथ्वीचे चुंबकीय क्षेत्र आणि वातावरण या कणांपासून संरक्षण करतात; परंतु चंद्रावर या दोन्ही गोष्टींचा अभाव आहे. त्यामुळे त्याचा परिणाम तिथे दिसून येतो. हे प्रोटॉन चंद्राच्या इलेक्ट्रॉनशी टक्कर देतात. त्यामुळे ते हायड्रोजन अणू तयार करतात. हे हायड्रोजन अणू नंतर सिलिकासारख्या खनिजामध्ये ऑक्सिजनसह एकत्रित होऊन हायड्रॉक्सिल आणि पाणी बनतात. संशोधक येओ म्हणतात, आश्चर्याची गोष्ट म्हणजे चंद्राच्या मातीत असणारे घटक सूर्यापासून आले आहेत. नेहमी हायड्रोजन उत्सर्जित करणाऱ्या सूर्याकडून येणारी चंद्राची माती आणि मूलभूत घटक यातूनच पाणी तयार होण्याची शक्यता असते.

शोध कसा लागला?

संशोधनादरम्यान संशोधकांनी स्पेक्ट्रोमीटरचा वापर केला. त्याच्या मदतीने चंद्राच्या मातीतील रसायनांचे निरीक्षण केले असता त्यात ठराविक काळानंतर बदल होत असल्याचे आढळून आले. त्यांनी सुमारे तीन मायक्रॉन इन्फ्रारेड शोषणात घट पाहिली, जे पाण्याच्या उपस्थितीचे चिन्ह आहे. मात्र किती शुद्ध पाण्याची निर्मिती झाली हे स्पष्टपणे सांगता आलेले नाही. त्यात हायड्रॉक्सिल आणि पाण्याचे दोन्ही रेणू तयार झाल्याचे डेटावरून स्पष्ट झाले आहे.

# कॅलिडोस्कोप

## आयर्लंडमध्ये साप का नाहीत?

ब्राझीलमध्ये भरपूर साप आढळतात. जगातल्या विविध देशांमध्येही साप पहायला मिळतात. मात्र एका देशात साप अस्तित्वातच नाहीत. कोणत्या देशात साप नसावेत, असा प्रश्न तुम्हाला पडला असेल. आयर्लंड या देशात साप नाहीत. यामागे बरीच कारणं आहेत. काही पौराणिक कथाही आहेत. त्यानुसार सेंट पॅट्रिक नावाच्या एक संताने ख्रिस्ती धर्माच्या सुरक्षेसाठी इथल्या सर्व सापांना गोळा केलं आणि समुद्रात फेकून दिलं. यासाठी त्यांना ४० दिवस उपाशी रहावं लागलं. ही झाली आख्यायिका. पण काही शास्त्रज्ञांच्या म्हणण्यानुसार आयर्लंडमध्ये कधीही साप नव्हते. या भागात एकेकाळी साप असले तरी प्रचंड थंडीमुळे ते नष्ट झाले, असं काही शास्त्रज्ञांचं मत आहे. प्रचंड थंडीमुळे इथले साप नष्ट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे हेच कारण ग्राह्य धरलं जातं.



## पक्ष्यांची वसाहत

सर्वसाधारणपणे माणसांसाठी वसाहती तयार केल्या जातात. पण गाझियाबादमध्ये पक्ष्यांसाठी वसाहत तयार करण्यात आली आहे. गाझियाबाद विकास महामंडळाच्या संचालकांच्या घराच्या गच्चीवर पक्ष्यांसाठी पाच मजली इमारत उभारण्यात आली आहे. हा पक्ष्यांसाठीचा गृहप्रकल्प आहे. या गृहप्रकल्पासाठी दोन लाख रुपये खर्च करण्यात आले. या प्रकल्पात ६० घरटी आहेत. म्हणजे प्रत्येक मजल्यावर १२ पक्षी राहू शकतात. ऊन आणि पावसापासून बचावासाठी या इमारतीवर छत्री लावण्यात आली आहे. चिमणी, बुलबुल, पोपट असे पक्षी इथे राहू शकतात. पक्ष्यांची घरटी लाकडापासून तयार करण्यात आली आहेत. पक्ष्यांचं हे अनोखं अपार्टमेंटच आहे. हा प्रकल्प प्राथमिक स्तरावर सुरू करण्यात आला आहे. इथे पक्षी राहू लागले तर शहरातल्या इतर इमारतींवरही अशाप्रकारे पक्ष्यांसाठी गृहप्रकल्प उभारण्यात येईल. याला 'बर्ड टॉवर' असं नाव देण्यात आलं असून सात फुटांचा हा मनोरा गाझियाबादमध्ये आकर्षणाचं केंद्र ठरला आहे. पक्ष्यांची संख्या वाढवणं आणि त्यांना अधिवास उपलब्ध करून देणं हा या प्रकल्पाचा उद्देश आहे.






## जुन्या पासबुकने बदलले नशीब!

कधी कधी अचानक आयुष्याला कलाटणी मिळते. एखादा जुना कागद नशीब बदलून टाकतो. सध्या असाच एक किस्सा चिलीतून समोर आला आहे. वडिलांच्या पासबुकने त्या व्यक्तीला करोडोपती बनवले. याची त्याने कधी कल्पनाही केली नव्हती.

हिनोजोसा नावाच्या माणसाला रद्दीत हा खजिना सापडला आणि काही काळातच तो करोडपती बनला. हा किस्सा लोकांना समजला तेव्हा सर्वजण म्हणू लागले की, नशीब असावे, तर असे. हा माणूस वडिलांच्या मृत्यूनंतर त्याच्या वस्तूंची वर्गवारी करत असताना खूप जुने, धुळीने माखलेले पासबुक सापडले. सुरुवातीला कचरा समजून त्याने दुर्लक्ष केले. मात्र मनात कुतूहल निर्माण झाले आणि त्याने पुन्हा एकदा पासबुक काळजीपूर्वक पाहिले. यावेळी त्याला रहस्य कळले ज्याचा त्याने स्वप्नातही विचार केला नव्हता. आता तो लवकरच करोडपती होणार आहे.

पैसे कसे मिळाले?

१९६०-७० च्या दरम्यान हिनोजोसाच्या वडिलांनी घर घेण्यासाठी १.४ लाख रुपये वाचवले होते. परंतु काही वर्षांपूर्वी ती बँक बंद पडली होती. त्यामुळे कुटुंबीयांना याबाबत काहीच माहिती नव्हती. मात्र पासबुकवर स्टेट गॅरंटी लिहिली होती. म्हणजे बँक बंद झाली तरी जमा केलेली रक्कम परत करण्याची जबाबदारी सरकारची असेल, असे त्यात नमूद करण्यात आले होते. याच्या आधारे त्या व्यक्तीने शासनाकडे मागणी केली असता सरकारने ती फेटाळून लावली.

न्यायालयाचा दणका

हार न मानता हिनोजोसाने पैसे मिळवण्यासाठी सरकारला न्यायालयात खेचले. अखेर प्रदीर्घ कायदेशीर लढाईनंतर न्यायालयाने त्यांच्या बाजूने निकाल दिला आणि सरकारला ६२ वर्षांच्या व्याजासह मूळ रक्कम परत करण्याचे आदेश दिले. न्यायाधीशांच्या आदेशामुळे व्याजासह ही रक्कम सुमारे १० कोटी रुपये (१.२ दशलक्ष डॉलर्स) वाढली. ध्यानीमनी नसताना हिनोजोसावर पैशाचा पाऊस पडला.



## शेवटची फ्लाईट...!

एका विमान कंपनीची फ्लाईट अटेंडन्ट नेहमीप्रमाणे नोकरीवर हजर झाली आणि विमानाने टेकऑफ घेताच प्रवाशांची सेवा करू लागली. पण तिच्या नशीबात काही वेगळेच होते. तिने कधी याचा विचारही केलेला नव्हता. आपल्याबाबत असे इतक्या लवकर कसे घडू शकते याचा विचारच तिच्या मनात आला नव्हता. त्यामुळेच तिने स्वत:ला चिमटा काढून पाहिला आणि आपण स्वप्नात तर नाही ना... याची खात्री करून घेतली.

तिची ही अवस्था होण्याचे कारण म्हणजे कॅसिनो गेममध्ये ५०० रुपये लावून तिने तब्बल २१ कोटीची रक्कम जिंकली होती. कॅसिनो डेज प्लॅटफॉर्मवर एक लिमिटेड ऑफर सुरू होती. त्यात एक लाख रुपयांच्या जमा रकमेवर १५० टक्के बोनस मिळत होता. एअर होस्टेस म्हणाली की, हा गेम खेळताना आधी मी एक लाख रुपये लावले. आधी मला दहा कोटी आणि नंतर २० कोटी व शेवटी २१,८३,०२,६७२ कोटी रुपये इतकी रक्कम मिळाली. ती माझ्या खात्यात जमा झाली. हे कळल्यावर खरेतर स्वत:वरच विश्वासच बसत नव्हता. ही रक्कम जिंकल्यानंतर तिने कॅसिनो डेजच्या सपोर्ट टीमला संपर्क साधला. त्यांनी सांगितले की बातमी खरी आहे. तुम्ही करोडपती झाला आहात. पुढे या महिलेने फ्लाईटचा इंटरकॉम उचलला आणि थेट घोषणाच करून टाकली. 'लेडीज एण्ड जंटलमन, मी तुमची एअर होस्टेस बोलत आहे आणि माझी ही शेवटची फ्लाईट आहे...' हे वाक्य ऐकून प्रवासी घाबरले. परंतु एअर होस्टेसने खरी बाब सांगितली. त्यानंतर प्रवाशांनी तिला शुभेच्छा देण्यास रांग लावली आणि केबिनमध्ये उपस्थित लोक चियर्स करू लागले.

## उत्तर कोरियात सॅनिटरी पॅडवर बंदी



उत्तर कोरियात किम जोंग हा हुकूमशहा आहे. तो आणि त्याची बहीण केव्हा काय निर्णय घेतील, हे सांगता येत नाही. या देशात नानातऱ्हेचे अजब-गजब कायदे आहेत. त्यातच आता तेथे महिलांना मासिक पाळीच्या काळात सॅनिटरी पॅड वापरण्यास बंदी घालण्यात आली आहे.

भारतात सॅनिटरी पॅड मशीन सगळीकडे बसवण्याची मागणी जोर धरत असताना या देशातील हुकूमशहाने हा अजब फतवा काढला आहे. मासिक पाळीविषयी आता समाजात मोकळेपणाने बोलले जाते. ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. पूर्वी शिवाशिव, कावळा शिवला, कावळा बसला असे सांकेतिक भाषेत हे सांगत असे. मात्र आता भारतीय समाजात बरेच बदल दिसत आहेत. मासिक पाळीमध्ये महिलांना शारीरिक आणि मानसिक त्रास होतो. या काळात महिलांना बाहेर फिरताना, कार्यालयीन काम करताना अडचणींचा सामना करावा लागतो. या काळात काळजी घेता यावी म्हणून बाजारात सॅनेटरी पॅड्स, मेंस्ट्रूअल कप्स आणि पीरियड पँटी अशा अनेक गोष्टी उपलब्ध असतात. त्यांचा वापर करून महिला आरामशीरपणे आणि आरोग्य जपत काम करू शकतात. स्वच्छतेची काळजी घेणेही शक्य होते. पण किम जोंगच्या राज्यात सॅनेटरी पॅडसह इतर वस्तूंवर बंदी घालण्यात आली आहे. आता उत्तर कोरियाच्या बाजारात सॅनेटरी पॅड नाहीत. त्यामुळे या देशातील महिला आणि मुलींना मासिक पाळीच्या काळात कपड्यांचा वापर करावा लागत आहे. एकदा वापरलेले कपडे धुवून त्याचा पुन्हा वापर करण्यात येतो. किम जोग सरकारने सॅनिटरी पॅड्सचे उत्पादन आणि आयातीवर निर्बंध घातले आहेत.

## पॉपकॉर्नविषयी...

चित्रपट बघताना पॉपकॉर्न खाल्ले जातात. या सुट्टीच्या दिवसांमध्ये मुलांची छोटी भूक भागवण्यासाठीही पॉपकॉर्न हा उत्तम पर्याय असतो. एकूणच पॉपकॉर्न हा अनेकांचा आवडता पदार्थ आहे. तेव्हा पॉपकॉर्न खाण्याची सुरूवात नेमकी कधी झाली, याचा इतिहास काय याबद्दल रंजक माहिती जाणून घेऊ.




* प्राचीन काळात अमेरिकेतले मूळ निवासी पॉपकॉर्न खात असत. मग युरोपियन लोकांनीही पॉपकॉर्न खायला सुरूवात केली, असं म्हटलं जातं.

* पॉपकॉर्न तयार करणारं मशीन १३४ वर्षांपूर्वी म्हणजे १८८५ मध्ये तयार करण्यात आलं. अमेरिकेतल्या चार्ल्स क्रेटरने हे मशीन तयार केलं होतं. चार्ल्स शेंगदाणे भाजणारं मशीन बनवण्याच्या प्रयत्नात होता. मात्र नंतर त्याचा वापर पॉपकॉन बनवण्यासाठी होऊ लागला.

* जवळपास चार हजार वर्षांपूर्वी पॉपकॉर्नचा शोध लावण्यात आल्याचं म्हटलं जातं. न्यू मेक्सिकोमध्ये हा शोध लावण्यात आला. त्या काळात पॉपकॉर्नचा वापर सजावटीसाठी केला जात असे. पॉपकॉर्नपासून दागिने बनवले जात असत, असंही म्हटलं जातं.

## वधू-वर हरवले एकमेकांच्या डोळ्यात!

लग्न म्हणजे केवळ दोन माणसांचं मीलन नसून ते दोन हृदयाचंही मीलन असतं आणि ते सुंदर रीतीने सगळ्यांसमोर आलं तर की सगळ्यांनाच आनंद होतो. असाच क्षण एका लग्नसमारंभात पाहायला मिळाला जेव्हा वधू-वर अचानक एकमेकांच्या डोळ्यात हरवून गेले आणि स्टेजवर 'तुमसा कोई प्यारा' गाण्यावर नाचू लागले. हा कोणताही दिखावा नव्हता, नाटक नव्हते तर एकमेकांप्रती असणाऱ्या सर्वांगसुंदर भावनेत साधेपणाने गुंडाळलेले खरे प्रेम होते.



त्यांना असे एकमेकांमध्ये हरवलेले बघून संपूर्ण वातावरणच प्रेमाच्या प्रकाशाने भरुन गेले.

लग्न असेल आणि त्यात प्रेमाची झलक नसेल तर उत्सव अपूर्णच वाटतो. पण या लग्नात वधू-वरांनी असे काही केले की सर्वांचे डोळे ओलावले आणि मन हसले. स्टेजवर 'तुमसा कोई प्यारा, कोई मासूम नहीं है...' च्या धूनवर दोघांनी रोमँटिक नृत्य करायला सुरुवात केली तेव्हा संपूर्ण वातावरण स्तब्ध झाल्यासारखे वाटले. हा लग्नसोहळा पारंपारिक पद्धतीने सुरू होता. विधीही याच पद्धतीने केले जात होते. मात्र संगीत सुरू होताच अचानक स्टेजवर उभ्या असणाऱ्या वधू-वरांनी एकमेकांचा हात धरला आणि गाण्यावर नाचायला सुरुवात केली. त्यात कोणत्याही उसने अवसान आणून वा सरावाने केलेल्या हालचाली नव्हत्या. ओव्हरड्रामॅटिक हालचालही नव्हती तर दोघांच्याही डोळ्यांमध्ये एकमेकांबद्दलचे प्रेम तीव्रतेने वाहत होते. वधूचे लाजून हसणे, वराचा साधेपणा आणि त्यांच्या दोघांमधील केमिस्ट्रीने विवाह मंडपाचे प्रेमाच्या मंदिरात रुपांतर झाल्याचेच सगळ्यांना जाणवले.

## असा आहे महागडा तुरुंग

तुरुंग म्हटला की तिथे कैदी असणारच. या कैद्यांवर प्रशासन बराच पैसाही खर्च करतं. त्याच्या रहाण्याची, खाण्याची, आरोग्याची व्यवस्था प्रशासनालाच करावी लागते. जगभरात अनेक तुरुंग आहेत. भारतातलेही बरेच तुरुंग प्रसिद्ध आहेत. मात्र जगातला सर्वात महागडा तुरुंग कोणता हे तुम्हाला माहीत आहे का? हा तुरुंग क्युबामध्ये आहे. इथे एका कैद्यावर कोट्यवधी रुपये खर्च होतात. 'ग्वांतानमो बे' असं या तुरुंगाचं नाव आहे. हा तुरुंग ग्वांतानमो खाडीच्या किनाऱ्यालगत आहे. या तुरुंगात ४० कैदी असून प्रत्येक कैद्यावर वर्षाला ९३ कोटी रुपये खर्च होतात. हा आकडा ऐकून प्रत्येकाचे डोळे विस्फारले असतील. या तुरुंगात १८०० पोलीस आहेत. प्रत्येक कैद्यामागे ४५ पोलीस आहेत. तुरुंगाच्या सुरक्षेसाठीच दरवर्षी ३९०० कोटी रुपये खर्च होतात. या तुरुंगात जागतिक स्तरावरचे अत्यंत धोकादायक कैदी आहेत. या तुरुंग परिसरात तीन इमारती असून दोन इमारतींमध्ये गुप्त मुख्यालयं आहेत. तसंच दोन रुग्णालयंही आहेत. वकिलांसाठीही वेगळी सोय करण्यात आली आहे. इथे वकील कैद्यांशी संवाद साधू शकतात. इथल्या कैद्यांना बऱ्याच सुविधा दिल्या जातात.



# शिक्षक भरती घोटाळ्यात एसआयटी नेमण्यात येणार : डॉ. पंकज भोयर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ४ :

राज्यात २०१९ पासून अनुदानित शिक्षण संस्थांमध्ये रूजू होणाऱ्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्याला शालार्थ आयडी देण्याचा अधिकार हा विभागीय शिक्षण उपसंचालकांना देण्यात आला. याचा फायदा घेत बनावट कागदपत्रांच्या आधारे अनुदानित शाळांमध्ये शिक्षकांची नियुक्ती करून वेतनास पात्र ठरवणारी शालार्थ आयडी प्रदान करण्याचा सर्रास प्रकार उपसंचालकांकडून सुरू होता. ही शालार्थ आयडी शाळांना आणि त्यानंतर वेतन व भविष्य निर्वाह निधी अधीक्षकांकडे पाठवली जाते.



अधीक्षकांकडून कुठलीही शहानिशा न करता वेतन अदा करण्यात आले. बनावट शिक्षक नियुक्त करणारी शाळा, उपसंचालक आणि वेतन अधीक्षकांच्या संगनमताने हा कोट्यवधी रुपयांचा घोटाळा करण्यात आला. या घोटाळ्याची व्याप्ती राज्यभर असून याची चौकशी विशेष तपास पथकाकडून(एसआयटी) करावी अशी मागणी शिक्षक संघटनाकडून होत आहे. यासंदर्भात राज्य शिक्षण मंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिली.

राज्यभर गाजत असलेल्या शिक्षक भरती आणि शालार्थ आयडी घोटाळ्याचा नागपूर सायबर पोलिसांकडून तपास सुरू आहे. यात आतापर्यंत काही अधिकारी आणि एका शिक्षकाला अटक करण्यात आली असून गैरमार्गाने शालार्थ आयडी तयार करणाऱ्या शेकडो शिक्षकांवर कारवाई होणार आहे.

नागपूर जिल्ह्यातून उघडकीस आलेला अपात्र शिक्षक भरती आणि शालार्थ आयडी घोटाळ्याची व्याप्ती राज्यभर असून आता सर्व प्राथमिक, माध्यमिक शाळांसह कनिष्ठ महाविद्यालयांचीही चौकशी केली जाणार आहे. शिक्षण आयुक्तांच्या स्तरावर ही चौकशी होणार असल्याची माहिती शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी नागपूर येथे पत्रकार परिषदेत दिली.

राज्यात २०१९ पासून अनुदानित शिक्षण संस्थांमध्ये रूजू होणाऱ्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्याला शालार्थ आयडी देण्याचा अधिकार विभागीय शिक्षण उपसंचालकांना देण्यात आला. याचा गैरफायदा घेत बनावट कागदपत्रे, शिक्षण संस्थांचा बनावट शिक्षक मान्यतेचा प्रस्ताव आणि शिक्षणाधिकाऱ्यांची खोटी स्वाक्षरी करून २०१९ पासून शेकडो शिक्षकांची भरती करण्यात आली. परंतु, २०१४ पासून गणित, विज्ञान आणि इंग्रजी विषयाच्या शिक्षक भरतीला मान्यता मिळाल्याने तेव्हापासूनच शिक्षक रूजू झाल्याचे दाखवण्यात आले. त्यांचे शालार्थ आयडी २०१९ पासून २०२५ पर्यंत गैरमार्गाने तयार करून आठ ते दहा वर्षांच्या थकबाकीची उचलही करण्यात आली.

शिक्षण संस्था चालक, शिक्षण उपसंचालक आणि वेतन अधीक्षकांच्या संगनमताने लाखो रुपयांचा आर्थिक व्यवहार करून हा सर्व घोटाळा झाला. अशाप्रकारे गैरमागार्ने शालार्थ आयडी तयार केलेल्या शिक्षकांवरही कारवाई होणार आहे. शिक्षक भरती घोटाळ्याची चौकशी ही विशेष तपास पथकाकडून(एसआयटी) घेण्याची यावी अशी मागणी सर्वच स्तरातून सुरू आहे. परंतु, शासनाकडून अद्यापही यावर कुठलाही निर्णय घेण्यात आलेला नाही. यासंदर्भात पंकज भोयर यांनी सांगितले की, एसआयटी नेमण्याचा अधिकार हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस घेणार आहेत.

# महिला बलात्कार प्रकरणी दोन शिक्षक निलंबित

■ महासागर प्रतिनिधी
बुलढाणा, दि. ४ :

मुलाचे गुण वाढवून देण्याचे आणि शैक्षणिक प्रगतीचे आमिष दाखवून विध्यार्थ्याच्या आईवर दोघा शिक्षकांनी शारीरिक अत्याचार केला होता. या प्रकरणातील दोन आरोपी शिक्षकांना शाळा व्यवस्थापनाने सेवेतून निलंबीत केले आहे.

मलकापूर येथील लोकसेवा शिक्षण बहूउद्देशिय मंडळद्वारा संचालित नूतन विद्यालय व कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयाचे मुख्याध्यापकानी ही कारवाई केली. समाधान आत्माराम इंगळे आणि अनिल थाटे अशी आरोपी व निलंबीत करण्यात आलेल्या शिक्षकांची नावे आहेत. हे दोघे नूतन माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात सहायक शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. या दोघांवर मागील २२ एप्रिल २०२५ रोजी गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आले.

पीडित महिलेने दिलेल्या तक्रारीवरून मलकापूर पोलिसांनी समाधान इंगळे (वय ४५, राहणार मलकापूर) व अनिल थाटे (वय ४७ मलकापूर) या दोघा विरुद्ध गुन्हे दाखल केले. यातील इंगळे हा पीडितेच्या मुलाचा वर्ग शिक्षक आहे. दुसरा आरोपी त्याच शाळेत आहे. यामुळे पीडिता व आरोपी यांची ओळख झाली, फोनवरून बोलणे सुरु झाले. साळसूद पणाचा आव आणणाऱ्या या शिक्षकांनी तुज्या मुलाला चांगले मार्क देऊ व पहिला नंबर आणू, त्यासाठी तू आम्हाला खूश कर असे आमिष दाखवत जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवले, असे तक्रारीत नमूद होते.

आरोपींनी पीडितेला वारंवार शारीरिक सुखाची मागणी करत तिला जिवे मारण्याची धमकीही दिली.वेळोवेळी तिच्यावर दोघांनी बलात्कार केला. हा घृणास्पद घटनाक्रम सप्टेंबर २०२४ ते २२ एप्रिल २०२५ या कालावधीत मलकापूर येथे घडला. शिक्षकी पेशाला काळिमा फासणाऱ्या या दोन नराधम शिक्षकांना अटक करण्यात आली होती.

आरोपी शिक्षकांना २२ एप्रिल ते ७ मे दरम्यान १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनाविण्यात आली. ४८ तासापेक्षा जास्त काळ कोठडी मध्ये राहिल्याने त्यांचे निलंबन अपरिहार्य ठरले. शिक्षणाधिकारी अनिल आकाळ यानी देखील परवानगी दिली. या घटनेने शाळेच्या प्रतिष्ठा, प्रतिमेवर वाईट परिणाम झाला. पालक व नागरिकांत संतप्त प्रतिक्रिया उमटली.

## मद्यधुंद डॉक्टर तरुणीचा रस्त्यावर गोंधळ

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ४ :

एका मद्यधुंद कारचालक डॉक्टर तरुणीने एका दुचाकी चालकाला धडक दिल्यानंतर त्याच्यासोबत वाद घालून रस्त्यावर गोंधळ घातला. त्यानंतर तिने पोलिसांशीसुध्दा वाद घातला. या प्रकरणी कोतवाली पोलिसांनी त्या तरुणीविरुद्ध गुन्हा दाखल केला. तरुणीच्या गोंधळामुळे रस्त्यावर मोठी गर्दी जमली होती. त्या तरुणीच्या गोंधळाची चित्रफित समाजमाध्यमांवर प्रसारित झाली. डॉ. क्षिप्रा (२५) असे आरोपी तरुणीचे नाव असून ती एमबीबीएसच्या अंतिम वषार्ला शिकत आहे. कोतवालीतील रामकुलर चौकात डॉ. क्षिप्रा ही शनिवारी सकाळी अकरा वाजता मद्यधुंद अवस्थेत कार चालवत होती. रामकुलर चौकात क्षिप्राने एका दुचाकीला धडक दिली. दुचाकी चालक निकिलेश ठाकरे याने दुचाकीच्या झालेल्या नुकसानाबाबत विचारणा केली. मात्र, क्षिप्राने त्याला शिवीगाळ करीत उलट कारचे नुकसान झाल्याचा दावा केला.

# विमानाने गांजा तस्करीचा प्रयत्न

## ओडिशाहून आले पार्सल, विमानतळावर प्रचंड खळबळ

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :

अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांकडून माल पोहोचविण्यासाठी वेगवेगळ्या शक्कल लढवण्यात येतात. कधी ट्रकांमध्ये विशेष कप्पा तयार केला जातो तर कधी आलीशान गाड्यांतून तस्करी केली जाते. मात्र आता तस्करांकडून माल पोहोचविण्यासाठी विमान आणि कुरिअर कंपन्यांचा वापर केला जात आहे. असेच एक पार्सल नागपूरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या कार्गो विभागात आले. मात्र सतर्क सुरक्षा अधिकारी आणि सोनेगाव पोलिसांनी तस्करीचा हा प्रयत्न हाणून पाडला. १०.२८ किलो गांजाचे हे पार्सल ओडिशातून उत्तरप्रदेशसाठी पाठविण्यात आले होते. सोनेगाव पोलिसांनी पार्सल जप्त करून गुन्हा दाखल केला आहे. विशेष म्हणजे पाठविणारा आणि स्वीकारणारा हा एकच व्यक्ती होता.

अमरावती मार्गावरील आठवा मैल येथे डीलिव्हरी या नावाने कुरीअर कंपनी आहे. या कंपनीत ओडिशाच्या राहुल फिटनेस, चपाडिया लॉजिस्टिक शोरूम येथून एक पार्सल आले. पॅकेजसह या पार्सलचे वजन जवळपास १२ किलो होते. पार्सल विमानाने शहाजहापूर, उत्तरप्रदेशला पाठवायचे होते. कुरीअर कंपनीने शनिवारच्या रात्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे पार्सल पोहोचविले. कार्गो विभागात कार्यरत सुरक्षा व्यवस्थापक योगेंद्र बोरीकर (३१) रा. कोराडी यांचे लक्ष या पार्सलवर गेले. वजनी असल्याने त्यांना संशय आला. त्यांनी सोनेगाव ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक नितीन मगर यांना माहिती दिली. मगर पथकासह विमानतळ परिसरात पोहोचले. तत्पूर्वी संवेदनशील प्रकरण असल्याने पोलिस उपायुक्त लोहित मतानी यांना माहिती दिली. त्यांच्या उपस्थितीत विमानतळाच्या कार्गो विभागातील डोमेस्टीक स्क्रिनींग मशीन क्रमांक १ समोर एनडीपीस कायद्याच्या तरतुदीचे पालन करून संशयित पार्सलची पडताळणी केली असता एक खाकी रंगाच्या खरड्यात एका बॅगमध्ये काळसर रंगाची ओलसर फुले, बिया, पाने, काड्या होत्या.

### राहुल फिटनेसच्या मालकाचा नकार

बॉक्स आणि पार्सलवर नोंद पत्त्यानुसार ते राहुल फिटनेसकडून उत्तरप्रदेशच्या शाहजहापूर येथे राहुल फिटनेसला पाठविण्यात आले होते. त्यामुळे पोलिसांनी राहुल फिटनेसच्या संचालकाशी संपर्क केला. त्यांनी अशाप्रकारचे कोणतेही पार्सल पाठविले नसल्याची माहिती दिली. हे पार्सल ओडिशातून डिलिव्हरी कंपनीच्या माध्यमातून रस्ता मार्गाने नागपूरला पोहोचले होते. डिलिव्हरी कंपनीने हे पार्सल विमानतळावर सोडले, जे आधी दिल्लीला जाणार होते. तेथून डिलिव्हरी कंपनी रस्ता मार्गाने ते पार्सल शाहजहापूरला पोहोचविणार होते.

## रेल्वेत महिलांना दमदाटी करून लुटमार

**गोंदिया:** नागपूर-रायपूर पॅसेंजर गाड़ीमध्ये भीक मागण्याच्या बहाण्याने गाडीत प्रवेश करीत दोघांनी महिला प्रवाशांची लुटमार करून इतर ही प्रवाशांना दमदाटी केल्याचा गंभीर प्रकार. शनिवारी धानोली स्थानकावर दुपारी १:३५ वाजता दरम्यान सालेकसाच्या बाबाटोली येथील दोन व्यक्ती भिक मागण्याच्या बहाण्याने गाडीत शिरले. त्यांनी गाडीत शिरल्या बरोबर भीक मागणे सुरू केले. महिला प्रवाशांना एकटी बघून त्यांना दमदाटी करून पैसे हिसकावून घेतले. दरम्यान काही पुरुष प्रवाशांनी प्रतिकार केला असता त्यांना मारहाण देखील केली.

# नागपुरात संघाचा कार्यकर्ता विकास वर्गाचे आयोजन

## ११ मे ते ६ जून दरम्यान रेशीमबाग येथे प्रशिक्षण

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ४ :

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विविध प्रशिक्षण वर्गांना सुरुवात झाली असून कार्यकर्ता विकास वर्ग-२ (तृतीय वर्ष) आगामी ११ मे या "मदर्स-डे"पासून नागपुरात प्रारंभ होणार आहे. सरसंघचालक मोहन भागवत, सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांच्या उपस्थितीत या संघ शिक्षा वर्गाचा शुभारंभ होईल.



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रचार विभागाकडून प्राप्त माहितीनुसार संघात पूर्वी प्राथमिक, प्रथम, द्वितीय आणि तृतीय संघ शिक्षा वर्गांचे आयोजन केले जात असे. या वर्गांचा कालावधी देखील अधिक होता आणि त्यांचे स्वरूप देखील निराळे होते. परंतु, नागपुरात २०२४ मध्ये झालेल्या संघाच्या अखिल भारतीय प्रतिनिधीसभेत नवीन अभ्यासक्रम स्वीकारण्यात आले. त्यानुसार संघाच्या प्राथमिक शिक्षा वर्गाचा कालावधी ७ दिवस करण्यात आला आहे. हा वर्ग प्रांतानुसार होतो. यंदा विदर्भ प्रांतात २५ एप्रिल ते २ मे दरम्यान नागपूरच्या रेशीमबाग येथील डॉ. हेडगेवार स्मृती मंदिरात हा वर्ग संपन्न झाला. तर विदर्भ प्रांतातील तरुण व्यवसायिकांसाठी १८ ते २५ मे या कालावधीत नागपूर जिल्ह्यातील खापरी येथे प्राथमिक वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच अकोला येथे १६ मे ते १ जून २०२५ या कालावधीत संघ शिक्षा वर्ग होणार आहे. त्याचप्रमाणे कार्यकर्ता विकास वर्ग-१ (सामान्य) यंदा ११ मे ते १ जून या काळात नाशिक येथे होईल. तर कार्यकर्ता विकास वर्ग-१ (विशेष) ७ ते २७ मे दरम्यान गुजरातच्या राजकोट येथे होणार असून कार्यकर्ता विकास वर्ग-२ ११ मे ते ६ जून या कालावधीत नागपूरच्या रेशीमबाग येथे आयोजित करण्यात आला आहे. ११ मे रोजी सकाळी ९ वाजता सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत भारतमाता पूजनासह या वगार्ला सुरूवात होणार आहे. या वगार्चा समारोप ६ जून रोजी होणार असून समापनाला सरसंघचालक डॉ. मोहन भागवत देशभरातून आलेल्या स्वयंसेवकांना मार्गदर्शन करणार आहेत.


# भारताच्या "क्रिएटर नेशन"ला बळकटी देण्यासाठी युट्यूबचे ८५० कोटी




लोकार्थ

मुंबईतील पहिल्या जागतिक ऑडिओ व्हिज्युअल आणि मनोरंजन शिखर परिषदेत [वेव्हज], युट्यूबचे सीईओ नील मोहन यांनी भारताचा "क्रिएटर नेशन" म्हणून उदय झाला हे उघड केले. त्यांनी खुलासा केला की गेल्या वर्षी भारतातील १०० दशलक्षाहून अधिक चॅनेल्सनी कंटेंट अपलोड केला, त्यापैकी १५,००० हून अधिक चॅनेल्सनी दहा लाखांपेक्षा जास्त सबस्क्राइबर्सना पाठवले.

त्यांनी युट्यूबच्या महत्त्वपूर्ण आर्थिक परिणामावर भर दिल्याचे सांगत गेल्या तीन वर्षांतच या प्लॅटफॉर्मने भारतीय निर्माते, कलाकार आणि मीडिया कंपन्यांना २१,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त पैसे दिले आहेत.

युट्यूबने या निर्मात्यांना त्यांच्या आवडी यशस्वी व्यवसायात रूपांतरित करण्यासाठी आणि निष्ठावंत जागतिक चाहते जोपासण्यासाठी कसे सक्षम केले आहे यावर नील यांनी भर दिला. भारताच्या वाढत्या क्रिएटर अर्थव्यवस्थेच्या वाढीला आणखी गती देण्यासाठी पुढील दोन वर्षांत ८५० कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणूक करण्याची घोषणा त्यांनी केली. गेल्या वर्षी, भारतात तयार केलेल्या कंटेंटने देशाबाहेरील प्रेक्षकांकडून ४५ अब्ज तासांचा पाहण्याचा वेळ मिळवला.

नील मोहन म्हणाले, "युट्युब निर्मात्याला कुठेही आणि कुठेही असलेल्या प्रेक्षकांशी जोडण्याची क्षमता सांस्कृतिक निर्यातीचे एक शक्तिशाली इंजिन बनवते आणि भारताइतके प्रभावीपणे काही राष्ट्रांनी याचा वापर केला आहे. आज, भारत केवळ चित्रपट आणि संगीतासाठी जागतिक नेता नाही, ते वेगाने "निर्माता राष्ट्र" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या देशासारखे होत आहे."

■ ■ ■




## शाहरुख खान हारपिकचा नवा ब्रँड ॲम्बेसेडर

हारपिकने शाहरुख खानच्या साथीत हारपिक है ना... ही नवीन मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेमार्फत शौचालय स्वच्छतेच्या प्रत्येक पैलूमध्ये हारपिकची श्रेष्ठता अधोरेखित केली असून, प्रत्येक घरात उच्च दर्जाची स्वच्छता मिळवून देण्याचा विश्वास सुद्धा व्यक्त करण्यात आला आहे.

भारतातील क्रमांक 1 शौचालय व बाथरूम क्लिनर आणि 10 कोटींपेक्षा अधिक कुटुंबांचा विश्वास संपादन करणाऱ्या गृहस्वच्छतेच्या अग्रगण्य ब्रँड हारपिकने आज आपल्या यशस्वी प्रवासातील एक ऐतिहासिक क्षण जाहीर केला आहे, बॉलीवूडचा बादशहा शाहरुख खान आता हारपिकचा ब्रँड ॲसम्बेसेडर असेल. ही विशेष भागीदारी हारपिकनेच्या उत्कृष्ट स्वच्छतेच्या परंपरेला शाहरुख खानच्या लोकप्रियतेशी, मूल्यांशी आणि भारतीय कुटुंबांवरील प्रभावाशी जोडते.

शंभर वर्षांहून अधिक काळापासून हारपिकने जागतिक पातळीवर स्वच्छता आणि आरोग्याच्या मानकांना नव्याने परिभाषित करण्याचे नेतृत्व केले आहे. आज हारपिक भारतातील दर तीनपैकी एका कुटुंबापर्यंत पोहोचत असून, कुटुंबांना सक्षम बनवण्यात त्याने मोलाची भूमिका बजावली आहे. हे एक प्रभावी, विश्वासार्ह आणि शक्तिशाली स्वच्छतेचे समाधान प्रदान करते. शाहरुख खान यांच्यासोबतची भागीदारी हा हारपिकच्या प्रवासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार आहे, जो प्रत्येक भारतीय घरात स्वच्छता, सन्मान आणि काळजीची प्रेरणा देण्याचे उद्दिष्ट बाळगतो. ■ ■

## बॉलीवूड स्टार पंकज त्रिपाठी युरो ॲटडहेसिव्ह्जचा ब्रँड अम्बेसेडर

ज्योती रेसिन्स ॲन्ड ॲडेसिव्ह्ज लिमिटेडची प्रमुख ब्रँड युरो ॲडहेसिव्ह्ज जी भारतातील लाकूड ॲडेसिव्ह्जच्या श्रेणीत सर्वात वेगाने वाढणाऱ्या ब्रँड्सपैकी एक आहे हिने प्रख्यात अभिनेता पंकज त्रिपाठी यांची पहिल्यांदाच ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती केली आहे.

ही भागीदारी राष्ट्रीय स्तरावर ब्रँडचा विस्तार साधण्याच्या आणि ग्राहक, व्यावसायिक तसेच व्यापारी भागीदारांशी अधिक मजबूत नाते निर्माण करण्याच्या व्यापक दृष्टीकोनाचा एक भाग आहे. या घोषणेसोबतच युरो ॲडेसिव्ह्जची नवीन जाहिरात मोहीम सुरू होत आहे ब्रँडच्या विकसित झालेल्या मूल्य प्रस्तावाचे प्रभावी सादरीकरण.

ही मोहीम केवळ मजबूत जोड नव्हे, तर जलद वाळणं, दीमक प्रतिकार, जलरोधकता, हवामान प्रतिकारक्षमतेसारख्या फायद्यांची खात्री देते आणि कमी उत्पादन वापरून अधिक कव्हरेज प्रदान करते. ही जाहिरात मोहीम मे 2025 मध्ये टीव्ही, प्रिंट, डिजिटल व बाह्य माध्यमांवर सुरू होणार आहे.या मोहिमेमध्ये पंकज त्रिपाठी वेगवेगळ्या भूमिकांमध्ये दिसतात.

एक शेजारचा हार्डवेअर दुकानाचा मालक आणि एक सजग गृहस्वामी जिथे प्रत्येक चित्रफितीत दैनंदिन आयुष्यातील ॲडेसिव्ह्ज संदर्भातील समस्येचं युरो ॲडेसिव्ह्जद्वारे समाधान दाखवण्यात आले आहे. ■ ■




संकलन - संयोजन
सुबोध रणशेवरे
९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com


# अपघातमुक्त प्रवासासाठी उमरेड क्षेत्रातील रस्त्यांचे सर्व प्रकल्प पूर्ण करणार

# नितीन गडकरी यांचे माजी आमदार सुधीर पारवे यांना आश्वासन



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ४ :

मागील पंधरा दिवसात उमरेड-भिवापूर या अरूंदमार्गावर दोन मोठे अपघात झाले. यात तीन जणांचा हकनाक बळी गेला. ४१ प्रवासी जखमी झाले. मागील वर्षभरात अपघातांचे प्रमाण, त्यातील मृतक आणि जखमींचा आकडा अंगावर शहारे आणणारा आहे. त्यामुळे माजी आमदार सुधीर पारवे यांनी अपघातमुक्त आणि सुरळीत वाहतुकीच्या दृष्टीने उमरेड विधानसभा क्षेत्रातील महत्वाच्या मार्गाचे चौपदरीकरण आणि अत्यावश्यक ठिकाणी पुल उभारणीकरीता भरिव निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली आहे.

यासंदर्भात रविवारला (दि.४) त्यांनी केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांची नागपूर येथील निवास्थानी भेट घेतली. उमरेड, भिवापूर व कुही तालुक्यातील नागरिकांच्या तोंडी व लेखी तक्रारींचा अभ्यास करून माजी आमदार सुधीर पारवे यांनी प्रामुख्याने खालील मागण्यांचे निवेदण देत, त्या प्रकर्षाने सोडविण्याची विनंती केली.

वरील सर्व कामांकरीता भरीव निधी आणि अत्यावश्यक मार्गाची तात्काळ दर्जेदार पध्दतीने बांधनी झाल्यास उमरेड क्षेत्रातील अपघातांचे प्रमाण निश्चीतच कमी होईल. असा विश्वास माजी आमदार सुधीर पारवे यांनी व्यक्त केला. याप्रसंगी केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांनी निवेदणातील सर्व कामे प्राधान्याने वेळेत पुर्ण करण्याचे आश्वासन दिले. अपघातमुक्त उमरेड क्षेत्र साकारण्यासाठी आवश्यक त्या सर्व योजना राबविणार असुन त्यासाठी भरिव निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन सुध्दा त्यांनी माजी आमदार सुधीर पारवे यांना दिले.

### निवेदणातील नमुद महत्त्वाची कामे पुढीलप्रमाणे

उमरेड-भिवापूर-नागभीड (राष्ट्रीय महामार्ग ३५३डी) अंतर्गत किमी ४८.४०० ते ९६.४४५ पर्यंत रस्त्याचे चौपदरीकरणाला तात्काळ मंजुरी देण्यात यावी.
नागपूर-उमरेड महामार्ग अंतर्गत रेल्वेपुलीया ते जुनी गीरडकर पॉलिटेक्निक (बाबा सावजी) पर्यंत २ किमी लांबीचा नवीन उड्डाणपूल (पिल्लरवाला) बांधणे.
सी.आर.एफ अंतर्गत आंभोरा ते भंडारा मार्गावर दुसऱ्या फेजच्या नवीन केबल स्टेड पुलाचे बांधकाम.
सी.आर.एफ अंतर्गत भिवापूर-जवळी-भगवानपूर-नांद-पांजरेपार मार्ग दोन पदरी रस्त्याचे रुंदीकरण, सिमेंट कॉंक्रीट रस्ता व पूल बांधणे. सी.आर.एफ अंतर्गत उमरेड-मांगरूड-बेसूर-सिर्सी-गिरड-समुद्रपूर-सेवाग्राम-वर्धा मार्ग (राज्यमार्ग-३२६) याचा दर्जा वाढवून राष्ट्रीय महामार्गात रुपांतर करून ९० किमीचा चौपदरी रस्ता बांधणे.
खात-खरबी-राजोला-मांढळ-बाम्हणी-गावसुत- उमरेड-मकरधोकडा-बुट्टीबोरी मार्ग याचा दर्जा वाढवून राष्ट्रीय महामार्गात रुपांतर करून ९२ किमीचा चौपदरी रस्ता बांधणे.

## महिला डाकपालाने केली १ लाख ६३ हजार रुपयांची अफरातफर

■ महासागर प्रतिनिधी, गोंदिया, दि. ४ :

खातेदाराने जमा करण्यासाठी दिलेली रक्कम त्यांच्या खात्यात जमा न करणे, तसेच खातेदारांच्या बनावट स्वाक्षरी करून त्यांच्या खात्यातून पैसे विड्राल करून महिला डाकपालाने १ लाख ६३ हजार रुपयांची अफरातफर केल्याची घटना तिरोडा तालुक्यातील ठाणेगाव येथील पोस्ट ऑफिसमध्ये उघडकीस आली. याप्रकरणी उपविभागीय डाक निरीक्षक यांच्या तक्रारीवरून आरोपी डाकपाल जयश्री ओमप्रकाश टेकाम, रा. बेरडीपार हिच्यावर तिरोडा पोलिस येथे शनिवारी फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

तक्रारीनुसार आरोपी जयश्री टेकाम या तिरोडा तालुक्यातील ठाणेगाव येथील पोस्ट ऑफिसमध्ये डाकपाल पदावर कार्यरत असताना, तिला खातेदार उषाबाई वासुदेव खोब्रागडे, रा. ठाणेगाव यांनी २६ जुलै २०२३ ते २५ सप्टेंबर २०२३ पर्यंत एक लाख १० हजार रुपये ठाणेगाव शाखा पोस्ट ऑफिसला येऊन आपल्या बचत खाते क्रमांक ८९५७६४३७४३ मध्ये भरण्यासाठी जयश्री टेकाम हिला दिले होते. जयश्री टेकाम हिने एकूण १ लाख १० हजार रुपये खातेदाराच्या खात्यामध्ये जमा न करता आपल्या व्यक्तिगत कामासाठी वापरली.

# पेट्रोलपंपांवर डिजिटल पेमेंट बंद

## सायबर फसवणुकीमुळे १० मेपासून रोख व्यवहारांवर भर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ४ :

नागपूर जिल्ह्यातील सर्व पेट्रोलपंपांवर शनिवार १० मेपासून कोणत्याही प्रकारचे डिजिटल पेमेंट (फोनपे, गुगल पे, पेटीएम, डेबिट/क्रेडिट कार्ड) स्वीकारले जाणार नाही, असा निर्णय विदर्भ पेट्रोलियम डीलर्स असोसिएशनने घेतला आहे.




सायबर फसवणुकीच्या वाढत्या घटनांमुळे बँक खात्यातील रक्कम गोठवली जात असल्याने हा निर्णय घेण्यात आल्याचे संघटनेचे म्हणणे आहे.कोव्हिडनंतर देशभरात डिजिटल व्यवहार मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. मात्र, याचाच गैरफायदा सायबर गुन्हेगार घेत असून काही बनावट व्यवहारांमुळे पंप चालकांच्या खात्यांतील लाखो रुपयांची रक्कम बँकांनी गोठवली आहे.

काही प्रकरणांमध्ये तर संपूर्ण बँक खातीच गोठवण्यात आली आहेत. जर या समस्येचे लवकरात लवकर समाधान झाले नाही, तर संपूर्ण महाराष्ट्रात डिजिटल पेमेंट बंद करण्याचा विचार संघटना करत आहे, असे यावेळी विदर्भ पेट्रोलियम डीलर्स असोसिएशनचे अध्यक्ष गौरव जैस्वाल यांनी सांगितले.संबंधित खात्यांतील रक्कम गृहमंत्रालयाच्या आदेशाशिवाय परत मिळवता येत नाही. ही प्रक्रिया अत्यंत गुंतागुंतीची असून, सायबर क्राइम विभागाकडे तक्रार देऊनही अद्याप कोणतेही समाधानकारक उत्तर मिळालेले नाही. परिणामी, इंधन पुरवठ्यावर परिणाम होत असून, व्यवसाय ठप्प होण्याच्या मार्गावर आहे.

पंपचालकांच्या म्हणण्यानुसार, दररोज हजारो डिजिटल व्यवहार होतात. ग्राहक कोणत्या खात्यातून पैसे पाठवत आहेत, त्याचा इतिहास काय आहे, याची माहिती घेणे पंपचालकांच्या आवाक्या बाहेरचे आहे. त्यामुळे प्रत्येक व्यवहाराची पडताळणी करणे अशक्य आहे. ग्राहकांची गैरसोय होणार असल्याची आम्हाला जाणीव आहे. मात्र, खात्यातील रक्कम गोठवल्यामुळे आमचा नाईलाज झाला आहे. हा निर्णय टाळणे शक्य नाही, असे अमित गुप्ता, मुस्तफा हस्सनजी, नरेंद्र मुळे, अभिजित भगत आदी पदाधिकाऱ्यांनी सांगितले. विदर्भ पेट्रो डिलर असोसिएशनने डिजिटल पेमेंट बंदीचा निर्णय घेतला आहे. मात्र त्यांचा ग्राहकांवर परिणाम होणार हे निश्चित आहे. डिजिटल इंडियासाठी आग्रही असलेल्या सरकारकडून या निर्णयासंबंधी कोणती भूमिका घेतली जाते हे पाहणे महत्त्वाचे असणार आहे.